cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८८ | बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नावाला देशप्रेम मानसीकता मात्र बूरसटलेलीच !

शेतात जे पेरले जाते तेच उगवते हे सामान्यज्ञान आहे. बाभळीची बी पेरली आणि माणसाने कितीही प्रयत्न केले तरी त्याला आंबे लागणार नाहीत. काटेरी झुडुपच उगवणार. जातीपातींच्या विषवल्लीचे तसे झाले आहे. जातीपातीची विषारी मुळे समाजात खोलवर रुजली आहेत आणि तिला मोठ्या प्रमाणात विषारी फळे लागत आहेत.

## थोडक्यात...

### बिलासपूरजवळ मोठा रेल्वे अपघात; चार ठार

बिलासपूरः छत्तीसगडमधील बिलासपूरमधील लालखदानजवळ मंगळवारी (दि. ४) भीषण रेल्वे अपघात झाला. हावडा मार्गावर प्रवासी ट्रेन आणि मालगाडीची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, अनेक डबे रुळावरून घसरल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. अनेक प्रवासी जखमी झाल्याची भीती व्यक्त होत आहे. जयरामनगर स्टेशन दरम्यान ही घटना घडली. वृत्तानुसार, ही टक्कर इतकी भीषण होती की त्यामुळे ओव्हरहेड वायर्स आणि सिग्नल सिस्टीमचे मोठे नुकसान झाले. रात्री उशिरापर्यंत रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे आणि जिल्हा प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले.

### राज्यात कुष्ठरोग रुग्णांची नोंदणी बंधनकारक

पुणेः राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि या रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने कुष्ठरोगाला आरोग्य यंत्रणेला कळविणे बंधनकारक असलेला आजार (नोटिफायबल डिसीज) म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे तसेच कुष्ठरोग साहाय्यक संचालक कार्यालय येथे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक असणार आहे. कुष्ठरोग हा मायकोबॅक्टेरीयम लेप्री या जंतूमुळे होणारा आजार असून त्वचा, परिघीय नसा, डोळे आणि इतर अवयवांवर त्याचा परिणाम होतो. या आजाराबद्दल समाजात अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव कायम आहेत.

### अन्यथा चित्रपटगृह ओस पडतील – सुप्रीम कोर्ट

नवी दिल्लीः तुम्ही पाण्याच्या बाटलीसाठी १०० रुपये, कॉफीसाठी ७०० रुपये आकारता. सिनेमागृहे कमी होत असल्याने लोकांनी येऊन आनंद घेणे अधिक वाजवी बनवा, अन्यथा चित्रपटगृहे ओस पडतील, अशी चिंता सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली. तिकिटांचे दर २०० रुपयांपर्यंत मर्यादित ठेवावेत, असा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला होता. या निर्णयाला कर्नाटक उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, मात्र काही अटींचे पालन करण्याचे निर्देश दिले होते. याविरोधात 'मल्टिप्लेक्स असोसिएशन ऑफ इंडिया' आणि इतरांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

### हिंदू देव–देवतांविरोधात पोस्ट करणाऱ्यांना बेड्या

लखनौः इंस्टाग्रामवर फॉलोअर्स वाढविण्यासाठी हिंदू देवतांच्या विरोधात अपमानास्पद टिप्पणी करणारी रील पोस्ट केल्या प्रकरणी एका अल्पवयीन मुलीला बालसुधार गृहात पाठवण्यात आले आहे. तर पोलिसांनी तिच्या पालकांना अटक केली आहे. अल्पवयीन मुलीने एक मिनिटांचा व्हिडिओ २७ ऑक्टोबर रोजी इंस्टाग्रामवर पोस्ट केला होता. यामध्ये मुलगी हिंदू देवतांविरोधात टिप्पणी करताना दिसली. ही पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. हिंदू संघटनांनी मुलीसह तिच्या कुटुंबाविरुद्ध निदर्शने करत त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी मुलीला बाल सुधार गृहात पाठवले. तर मुलीने पोस्ट केलेल्या व्हिडिओची माहिती असल्याने पालकांना अटक केली. इतर काही लोकही यात सामील होते. त्यांनी हा गुन्हा लपविण्याचा प्रयत्न केला, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

### महिला क्रिकेट खेळांडूचा होणार बक्षिसासह गौरव

मुंबई : आयसीसी महिला विश्वचषकावर पहिल्यांदाच भारताचे नाव कोरणाऱ्या भारतीय संघाचे मंगळवारी (दि.४) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभिनंदन करण्यात आले. याबाबतच्या अभिनंदन प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय संघाच्या या घवघवीत यशाबाबत गौरवोद्गार काढले. भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मानधाना, जेमिमा रॉड्रिग्ज, आणि राधा यादव यांना या ऐतिहासिक विजयातील भागीदारीसाठी रोख पारितोषिकाने गौरव करण्याचा निर्णय देखील मंत्रिमंडळ बैठकीत मंजुर करण्यात आला. त्याचबरोबर संपूर्ण टीमचा देखील सत्कार करण्यात येणार आहे.

# राज्यातील दोन कोटी कुटुंबाच्या जमिनी होणार अधिकृत

## तुकडेबंदी कायद्याच्या सुधारणा लागू

मुंबई । प्रतिनिधी


**जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्याचा अध्यादेश राज्यात लागू करण्यात आल्याने, अकृषिक वापरासाठी परवानगी असलेल्या क्षेत्रातील जमिनींसाठी आता तुकडे बंदी कायदा लागू राहणार नाही, अशी क्रांतिकारी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली होती. याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले असून, यामुळे आजवर तुकडेबंदी कायद्याविरुद्ध जमिनीचे झालेले व्यवहार नियमित केले जातील.**



महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्यातील सुमारे ४९ लाख कुटुंबधारकांची जमीन (म्हणजे सुमारे दोन कोटी कुटुंबसदस्य असलेली) नियमित होईल. या सर्वांच्या सात बारावर नाव लागेल आणि नोंदणी होईल. या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून १५ ऑक्टोंबर २०२४ पर्यंतच्या तुकड्यांचे झालेले हस्तांतरण हे कोणतेही शुल्क न भरता नियमित करता येईल. अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर कार्यप्रणाली पुढील सात दिवसांत महसूल विभागाकडून जारी केला जाईल. या निर्णयामुळे ले–आऊटमधील प्लॉटधारकांचे नाव मालकासह सातबारा उताऱ्यावर येणार आहे, ज्यामुळे मोठा गोंधळ दूर होईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले. राज्यात अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा मूळात शेती क्षेत्रासाठी लागू होता. किफायतशीर शेती करण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार (बागायत / जिरायत) आवश्यक असलेले प्रमाणभूत क्षेत्र या कायद्याने ठरवले होते.

◀◀ पान २ वर

# नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला निकाल



## राज्य निवडणूक आयोगाची मोठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोग आयुक्त दिनेश वाघमारें यांनी मंगळवारी (दि. ४ नोव्हेंबर) पत्रकार परिषद घेऊन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला. राज्यातील आहे. त्यामुळे आता राज्यात राजकीय हालचालींना वेग येणार असून वातावरण तापू लागणार आहे.

राज्यभरातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांबाबत मोठी घडामोड झाली असून, न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन नगर परिषद व नगर पंचायत समित्यांच्या निवडणुकांविषयी महत्त्वाची माहिती दिली. राज्यात एकूण २४६ नगर परिषदा आणि एकूण १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगर पंचायतांच्या निवडणुका या टप्प्यात घेण्यात येणार आहेत. नगर परिषद सदस्यांची संख्या प्रत्येक ठिकाणी २० ते ७५ या दरम्यान आहे. प्रत्येक प्रभागातील एक सदस्यासाठी मतदारांना एकच मतदान

◀◀ पान २ वर

### ईव्हीएमद्वारेच मतदान

या सर्व नगर परिषद व नगर पंचायत निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन द्वारे घेण्यात येणार आहे. मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि कार्यक्षम व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने आवश्यक त्या सर्व तयारीस सुरुवात केली आहे.

### निवडणूक कार्यक्रम असा

१० नोव्हेंबर नाम निर्देशन पत्र दाखल. अंतिम मुदत १७ नोव्हेंबर. छाननी १८ नोव्हेंबर. माघारी २१ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर (अपील). २६ ला अंतिम यादी जाहीर. मतदान – २ डिसेंबर २०२५. निकाल – ३ डिसेंबर २०२५.

# पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देता येत नसेल तर तुमचा उपयोग काय?

## राज ठाकरे यांची निवडणूक आयोगावर टीका



मुंबई । प्रतिनिधी

निवडणुका आयोगाच्या मंगळवारच्या पत्रकार परिषदेची क्लिप मला कोणीतरी पाठवली. ती पाहून तळपायाची आग मस्तकात गेली आणि आता १००% खात्री पटली की, निवडणूक आयोग स्वायत्त आहे हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुलें आहे. तुम्हला एकाही प्रश्नाचे उत्तर देता येत नसेल तर तुमचा काय उपयोग आहे, अशा शब्दात निवडणूक आयोगावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निशाणा साधला. निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांची घोषणा केली त्या पार्श्वभुमीवर राज ठाकरे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

◀◀ पान २ वर

# आचारसंहितेपूर्वी सरकार गतिमान! एकाच दिवसात निघाले १४४ जीआर

मुंबई– बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन GR शासन निर्णय

राज्यातील महायुतीचे सरकार किती गतिमान आहे याचा प्रत्यय पुन्हा एकदा राज्यातील जनतेला आला आहे. मंगळवारी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची आचारसंहिता जाहीर झाली त्यापूर्वी राज्य सरकारने जवळपास १४४ शासन आदेश काढले असून, यात सर्वाधिक शासन आदेश हे नगर विकास विभागाचे आहेत.

राज्यातील महायुतीचे सरकार किती तत्पर आहे याचे उत्तम उदाहरण पुन्हा एकदा राज्यातील जनतेला पाहावयास मिळत आहे. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांचे आचारसंहिता लागली त्यापूर्वीच राज्य शासनाने मंगळवारी जवळपास १४४ शासन आदेश जारी केले. हे १४४ जीआर एकाच दिवशी जाहीर केले आहेत.


◀◀ पान २ वर

### सर्वाधिक निर्णय नगर विकास विभागासाठी

याच महिन्याच्या दहा तारखेपासून निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होत आहे आणि डिसेंबर मध्ये तीन तारखेला मतदान आणि निकाल. या निवडणुका नगरपालिका क्षेत्रातील असल्याने नगर विकास विभागाचे जवळपास ५१ शासन आदेश आजच्या बैठकीत काढण्यात आले आहेत.

# अनुदान घोटाळाः २८ आरोपी एलसीबीने पकडले फक्त सात

जालना । शिवाजी मस्के




जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात अनुदान घोटाळा प्रकरणी पुन्हा दाखल होऊन ७० दिवसांमध्ये आर्थिक गुन्हे शाखेला २८ आरोपी पैकी केवळ फक्त सहा आरोपी सापडले. परंतु सहा आरोपी पैकी एक आरोपी एका भरती प्रकरणी मध्ये मस्टर माईंड होता तो कोण आहे याचं कारण मात्र समजू शकले नाही. फक्त यासाठी प्रसिद्धी मिळण्यासाठी सहा आरोपी पकडले असल्याचे प्रेस नोट मध्यामातून माहिती देण्यात देण्यात येत आहे. बाकीचे इतर आरोपी कधी सापडतील याचे उत्तर मात्र आर्थिक गुन्हे शाखेकडे नसल्याचे दिसून येत आहे. सदरील घटनेचा गुन्हा २२ ऑगस्ट रोजी अंबड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडे देण्यात आज आला आहे. दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी आणखी एक आरोपी आर्थिक गुन्हे शाखेकडून अकोला येथून अटक करण्यात आला आहे सदरील आरोपीला ०७ दिवसाची मंजुर झाल्याला

◀◀ पान २ वर

# भारतात दोन देश एक श्रीमंतांचा तर दुसरा गरीब शेतकऱ्यांचा

पाटणा । वृत्तसंस्था



बिहारमध्ये गुरवारी पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. त्या पार्श्वभुमीवर बिहारमध्ये प्रचाराने वेग पकडला आहे. त्यातच निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी औरंगाबाद (बिहार) येथे झालेल्या सभेतून मोदी सरकारवर तीव्र शब्दात प्रहार केला. त्यांनी आरोप केला की, मोदी सरकारने देशातील सर्व सरकारी संपत्ती काही उद्योगपतींच्या हाती सोपवून 'दोन देश' (एक श्रीमंतांचा आणि दुसरा गरीब, शेतकरी व मजुरांचा) असे निर्माण केले आहे, असे म्हटले.

राहुल गांधी म्हणाले, मोदी सरकारने देशातील सर्व सरकारी कंपन्या विकल्या आहेत. वीज, रेल्वे, बंदरे, विमा योजनासर्व काही अदानी–अंबानींसारख्या उद्योगपतींना दिले. तुम्ही कितीही शिक्षण

◀◀ पान २ वर

# आचारसंहिता लागल्याने काही लाडक्या बहिणींचे पैसे थांबणार

मुंबई । प्रतिनिधी

नगरपंचायत आणि नगरपरिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्या आत. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार, २ डिसेंबरला मतदान होणार असून, ३ डिसेंबरला निकाल जाहीर केला जाईल. ही घोषणा केल्याने निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता सुरू झाल्याने लाभाच्या योजना राबविता येत नाहीत त्यामुळे लाडकी बहिण योजनाचे पैसे काही दिवसांसाठी थांबविले जाऊ शकतात.

आचारसंहितेमुळे मंत्री, शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे वित्तीय अनुदान देणे किंवा त्याबाबत घोषणा करणे पूर्णपणे बंदी आहे. असे केल्यास आचारसंहितेचा भंग होऊन कठोर कारवाई होऊ शकते. त्यामुळे लाडकी बहीण योजना अंतर्गत महिलांना मिळणारे पैसे तात्पुरते थांबणार आहेत. आचारसंहितेच्या नियमांनुसार, कोणत्याही प्रकारच्या नवीन योजना, प्रकल्प राबवता येणार नाहीत. वित्तीय अनुदान

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.४ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.५० क्विंटल | २,००१ | २,७६१ | २,५२६ |
| ज्वारी/हायब्रिड:१५५.५० क्विंटल | २,२०० | ३,४०१ | २,८७४ |
| मका/लोकलः ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ११.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८९० | ६,८४७ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरीः ७६.५० क्विंटल | २,००० | २,८८५ | २,६३७ |
| मुगः १.०० क्विंटल | ४,४०० | ४,५०० | ४,४५० |
| सोयाबीनः २४१.५० क्विंटल | ४,००० | ४,५११ | ४,३६४ |
| हरभरा:६.०० क्विंटल | ४,८५० | ५,१८१ | ५,०२७ |

# दुबार मतदाराच्या नावापुढे येणार डबल स्टार

## नगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी आयोगाने उचलले मोठे पाऊल




मुंबई । प्रतिनिधी

**दुबार आणि तिबार मतदाराबाबत राज्य निवडणूक आयोगाने विशेष दक्षता घेतली आहे. राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या सिस्टिमवर टुल विकसित केले आहे आणि या टुलच्या माध्यमातून प्रत्येक नगरपरिषद, नगरपंचायतीमधील प्रभागात संभाव्य दुबार मतदारासमोर डबल स्टार असे चिन्ह आलेले आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाने पत्रकारपरिषद घेतली. २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायती निवडणुकीबाबत ही पत्रकारपरिषद झाली. यावेळी विशेष करून दुबार मतदारासंदर्भात निवडणूक आयोगाचे आयुक्त वाघमारे यांनी घेतलेल्या दक्षतेबाबत सविस्तर माहिती दिली. जिथे जिथे असे चिन्ह आलेले आहे, तिथे संबधित मतदार अधिकाऱ्यांकडून संबंधित मतदारास संपर्क साधून तो कोणत्या प्रभागात आणि कोणत्या मतदार केंद्रात मतदान करणार याची माहिती घेतली जाईल. यासोबतच त्याचे नाव, पत्ता, फोटो, लिंग या सर्व बाबी देखील तपासल्या जातील. ज्या मतदान केंद्रात त्याने ऑप्शन दिले असतील, त्या मतदार केंद्रात त्याला मतदानाची सोय असेल. अन्य मतदार केंद्रात त्याला मतदान करता येणार नाही. ज्या मतदाराच्या नावासमोर डबलस्टार आलेला आहे आणि जर त्याने काहीही प्रतिसाद दिलेला नाही. तर त्याची सर्व मतदार केंद्रावर डबलस्टार अशी नोंद होईल. पण असा मतदार मतदान केंद्रावर आल्यानंतर त्याच्याकडून एक हमीपत्र लिहून घेतले जाईल, की या मतदारकेंद्राव्यतिरिक्त किंवा या मतदानानंतर तो दुसऱ्या मतदार केंद्रावर मतदान करणार नाही. केवळ एकाच मतदार केंद्रावर त्याला मतदान करता येईल.

cmyk

## अग्रलेख

# नावाला देशप्रेम मानसीकता मात्र बूरसटलेलीच !

शेतात जे पेरले जाते तेच उगवते हे सामान्यज्ञान आहे. बाभळीची बी पेरली आणि माणसाने कितीही प्रयत्न केले तरी त्याला आंबे लागणार नाहीत. काटेरी झुडुपच उगवणार. जातीपातींच्या विषवल्लीचे तसे झाले आहे. जातीपातीची विषारी मुळे समाजात खोलवर रुजली आहेत आणि तिला मोठ्या प्रमाणात विषारी फळे लागत आहेत. एरव्ही पारावर माणसे प्रगतीच्या गप्पा मारतात. समाज किती बदलत चालला आहे यावर व्याख्यान झोडतात. पण वेळ आली की जातीचाच विचार करतात. एकदा का भेदाभेदांच्या मुद्यावरून विवेक हरवला की माणसे विवेक गमावतात. असे झाले की बुद्धिमता आणि तिची आराधना करून मिळवलेले यश देखील माणसे त्यांच्याही नकळत जातींच्या तराजूत तोलतात.

बुद्धिमत्ता कोणाचीही मक्तेदारी नाही याची जाणीव होतच नाही. जातिबाह्य विवाह अजूनही स्वीकारार्ह नाहीत. जातीपातींच्या वृथा अभिमानापायी माणसे प्रसंगी त्यांचे माणूसपण देखील हरवून बसतात. समाजातील असे भेदाभेद नाहीसे करण्यासाठी संत आणि समाजसुधारकांनी कष्ट उपसले. त्यांचे आयुष्य वेचले. संतू म्हणे जाती दोनच त्या आहे. स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे.. असे संत जगनाडे महाराज म्हणतात. असे दाखले सगळ्याच संत साहित्यात सापडतात. ते अंमलात देखील आणायचे असतात याचा विसर सदासर्वकाळ संतांच्या नामाचा जयघोष करणार्या सर्वांना पडला आहे. जातीपातींवरून समाजाच्या या भरकटलेपणाचे पाप मोठ्या प्रमाणावर राजकारण्यांच्या माथी मारले जाऊ शकेल. संधी मिळेल तेव्हा राजकारणी, नेते मंडळी, त्यांचे कार्यकर्ते, पक्षपुरस्कृत सामाजिक संस्था आणि त्यांच्यामागोमाग सामान्य माणसे देखील संधी मिळेल तेव्हा जातीपाती नको असे मत हिरीरीने मांडतात. तरीही त्यांचे उच्चाटन होत नाही. कारण, तसे मनापासून कोणालाच वाटत नसावे. राजकीय पक्षांचे सगळे राजकारणच जातीपातींवर आधारीत बनले आहे. राजकीय आणि सत्ता स्वार्थासाठी जातीचेच गणित सगळे पक्ष मांडतात. विशेषतः, निवडणुकीच्या तिकिट वाटपात तर जात हाच मोठा आधार बनताना आढळतो. तोच दृष्टिकोन कार्यकर्त्यांमध्ये पाझरतो. किती राजकीय पक्ष खरेच जातीवर लाथ मारू शकतील? जातीपातीविरहित राजकारणाचा आदर्श उभा करू शकतील? पण ही विषवल्ली प्रसंगी भयावह रूप घेऊ शकते हा खरा धोका आहे. त्याची प्रचिती आणून देणाऱ्या घटना अधूनमधून घडतात. आताही घडत आहेत.

कोणत्याही घटनेकडे त्याच चष्म्यातून पाहण्याची स्वार्थी खोड सगळ्याच पक्षांना जडली आहे. त्यामुळेच कोणतीही अनुचित घटना घडली, की समाजमाध्यमांवर ध्रुवीकरण अनुभवास येते. सामाजिक मूल्यांचा ऱ्हास घडवून आणणाऱ्या घटनांकडे तटस्थ नजरेने पाहिले जायला हवे. त्याच्या परिणामांचा लेखाजोखा मांडायला हवा असे कोणालाच वाटेनासे झाले आहे. उलट अशा घटना भूतकाळात देखील घडल्या होत्या असे त्यांचे चुकीचे समर्थन केले जाते. स्वायत्त संस्थांना देखील याचे काटे बोचू लागले आहेत. संत आणि समाजसुधारक देखील सुटलेले नाहीत. ज्यांनी भेदांवर कठोर प्रहार केले, त्यांनाच जातीची लेबले लावली जातात. त्यांच्या विचारांचे आचरण हीच खरी त्यांची आठवण हे कोणाला पटत नाही किंवा त्यांना पटवून घ्यायचे नाही. अशी ही गुंतागुंत आहे.

परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकेल याची भीती बाळगण्याची वेळ आली आहे. पंडित नेहरू, महात्मा गांधी, सरदार पटेल, स्वा. सावरकर अशा नेत्यांचा समाजावर प्रचंड प्रभाव आणि नियंत्रण होते. लाखो लोक त्यांचा शब्द झेलत. अगदी मौन देखील धारण करत. कारण ते नेतेही देशाचाच विचार करत. त्यासाठी प्राणांचे मोल चुकवण्याची त्यांची तयारी होती. 'बोले तैसा चाले..' किंवा 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे', असेच त्यांचे आचरण होते. त्याचा नैतिक दबाव त्यांच्या कार्यकर्त्यांवर नसता तरच नवल. आता तशी खात्री कोणी देऊ शकेल का? आधी केले आणि मग सांगितले असे आचरण आढळू शकेल का? पण घडणाऱ्या घटनांचा सगळ्यांनी मिळून विचार करण्याची वेळ आली आहे. कारण, लोकांची माथी फिरवायला कोणताही मुद्दा पुरा होतो. तसे ते फिरले आणि कोणाचेही नियंत्रण नसेल तर समाजाला फुटीच्या उंबरठ्यावर यायला वेळ लागणार नाही.

# कर्जमाफी होत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी जीवन संपवले

**अंबड । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये आसमानी संकट, अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान तसेच गोदावरीला महापूर, शंभर टक्के नुकसान झाली असताना**



कर्जबाजारी शेतकऱ्यांनी, कर्जमाफी होत नसल्यामुळे आणि तसेच अपुरी मदत मिळाल्यामुळे आणि अतिवृष्टी व महापुराचे अनुदान तत्काळ खात्यामध्ये जमा न झाल्याने पाथरवाला बु. येथील शेतकरी हरिभाऊ आसाराम अवधुत यांने दोन दिवसापूर्वी पाथरवाला शिवारात कपाशीच्या शेतात लिबांच्या झाडाला गळफास घेत आत्महत्या करून जीवन यात्रा संपली ही घटना मंगळवारी (दि.४) सकाळी उघडकीस आली. पावसाने उघडीप दिल्याने कडक ऊन असल्याने बाजूच्या शेतातील कापूस वेचणाऱ्या महिलांच्या मुलांना ही घटना निदर्शनास आल्यानंतर त्यांनी ही माहिती गोंदी पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. शहागड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मृताच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. आता अपेक्षा वरली फक्त पत्नीला व मुला मुलीला न्याय मिळण्याची

# बीडमधील संत ज्ञानेश्वर व मुक्ताबाई यांचे आजोबांचे समाधी स्थळ अतिक्रमणाच्या विळख्यात

## गोविंदपंतांच्या समाधी परिसरातील अतिक्रमण तात्काळ काढा नसता गंभीर परिणाम होतील-मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील जैन भवन परिसरातील बिंदुसरा नदीकाठी असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज व संत मुक्ताई यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधी परिसरावर अतिक्रमणाचा विळखा बसला असून, त्यामुळे वारकरी आणि हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी तात्काळ कारवाई करुन अितक्रमण हटवावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, नगरपरिषद मुख्याधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे.**



बीड शहरातील गोविंदपंतांची समाधी हे वारकरी संप्रदायाचे अतिशय पवित्र स्थळ आहे. संत मुक्ताईंच्या जीवनाशी या स्थळाचा थेट भावनिक संबंध आहे. दरवर्षी आषाढी वारीच्या काळात संत मुक्ताईंची पालखी बीडमध्ये येते आणि या ठिकाणी आजोबा-नातीच्या भेटीचा पारंपरिक सोहळा पार पडतो. मुक्ताईंची पालखी गोविंदपंतांच्या समाधीस्थळी काही काळ विसावते, त्यामुळे हे स्थळ धार्मिक तसेच सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, अलीकडच्या काळात गोविंदपंतांच्या समाधी परिसरातील सुमारे १२०० चौ.मी. क्षेत्रावर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही जणांनी या ठिकाणी बांधकामे करून परिसराची पवित्रता भंग केली असून, वारकरी व भक्त वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सदरील ठिकाण संत परंपरेचे जिवंत प्रतीक आहे. येथे झालेल्या अतिक्रमणामुळे संत परंपरेचा अपमान झाला आहे. जिल्हा प्रशासनाने अितक्रमणधारकांवर ठोस कारवाई करून समाधी परिसर मूळ स्वरूपात आणावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे.

# अभंगराव मोरे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**



येथील जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियानचे जिल्हा समन्वयक संजय मोरे यांचे वडील अभंगराव श्रीपती मोरे यांचे रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी लातूर येथील राहत्या घरी पहाटे ३.३० वाजता निधन झाले. मृत्यसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. जुन्या पिढीतील अभंगराव मोरे हे शांत, परोपकारी आणि धार्मिक वृत्तीचे म्हणून ते सुपरिचित होते. स्व. अभंगराव मोरे यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी ४.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# प्रत्येक व्यसनावर मात करता येते-डॉ.टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**व्यसन म्हणजे अशी सवय जी सुरुवातीला आनंद, तणावमुक्ती किंवा समाधान देणारी वाटते पण काळानुसार ती शरीर, मन आणि वर्तनावर नियंत्रण मिळवते माणूस त्या सवयीशिवाय राहू शकत नाही आणि आयुष्याचे ध्येय, जबाबदाऱ्या, नाती सर्व विसरून जातो व्यसन दोन प्रकारचे असू शकते शारीरिक आणि मानसिक शारीरिक व्यसन म्हणजे शरीराला एखाद्या पदार्थाची सवय लागणे, जसे की दारू, सिगारेट, ड्रग्स मानसिक व्यसन म्हणजे एखादी गोष्ट मनातून सोडता न येणे, जसे की मोबाईल, गेमिंग, सोशल मीडिया**



व्यसनाचे प्रमुख प्रकार:

दारूचे व्यसन शरीरातील यकृत, हृदय आणि मेंदूवर घातक परिणाम, सिगारेट / बीडी फुफ्फुसांचे कर्करोग, श्वासाच्या अडचणी, तंबाखू, गुटखा, पान मसाला तोंडाचा कर्करोग, दातांचे नुकसान, ड्रग्स / नशेचे पदार्थ मानसिक संतुलन बिघडवतात, हिंसक वर्तन, मोबाईल / इंटरनेट / गेमिंग मेंदू सतत उत्तेजना, झोप आणि लक्ष कमी, जुगार / सट्टा आर्थिक नुकसान, घरात भांडण, समाजात अपमान, अन्न, साखर किंवा कॅफिनचे व्यसन हार्मोन्स बिघडवते, वजन वाढते, प्रेम किंवा संबंधाचे व्यसन अति आसक्तीमुळे मानसिक तणाव, कामाचे व्यसन व्यक्तीला विश्रांती मिळत नाही, तणाव वाढतो, सोशल मीडियाचे व्यसन सतत लाइक्स, व्ह्यूज यांचा विचार मनावर ताबा व्यसनामुळे शरीरात विषारी द्रव्ये जमा होतात रक्तप्रवाह कमी होतो, रोगप्रतिकारशक्ती कमी होते मानसिकदृष्ट्या व्यक्ती चिडचिडी, अस्थिर आणि एकाकी होते कुटुंबात भांडणं वाढतात, विश्वास कमी होतो समाजात मानहानी होते व्यसन हळूहळू आत्मविश्वास, आरोग्य आणि स्वप्नं हिरावून घेतं पण चांगली गोष्ट म्हणजे प्रत्येक व्यसनावर मात करता येते योग्य सल्ला, समुपदेशन आणि उपचारांनी माणूस पुन्हा नवजीवन जगू शकतो स्वतःवर विश्वास ठेवा पहिले पाऊल उचला आणि "मी व्यसनमुक्त होणारच" हा संकल्प करा निरोगी शरीर, शांत मन आणि आनंदी जीवन हीच खरी संपत्ती व्यसनातून मुक्त होण्यासाठी संपर्क: डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# आ.लोणीकरांच्या प्रयत्नामुळे ३४ ग्रामपंचायतीं ना मिळणार नवीन इमारत

**परतुर । प्रतिधि**

**गावचा गाव गडा चालवण्यासाठी सरपंच ग्रामसेवक व नागरिकांची उत्तम सुविधा व्हावी याकरिता, ग्रामसेवक सरपंच गावकरी यांना ग्रामसभा घेण्यासाठी चांगली इमारत असावी याकरिता आपण प्रयत्नपूर्वक मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री ग्रामविकास मंत्री यांच्या माध्यमातून परतूर मंठा नेर शेवली भागाकरिता ३४ ग्रामपंचायत कार्यालय मंजूर करून आणली असून येत्या काळात या कामांना सुरुवात होणार आहे**

त्यामुळे गावाच्या विकासाची गती वाढणार आहे असे मत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून अनेक नोंदी दाखले सर्वसामान्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते मात्र अनेक ग्रामपंचायतीन मोडकळीस आलेल्या इमारतीमुळे काम करण्यास अडचणी येत होत्या अनेक इमारती गळतात त्यामुळे नागरिकांच्या कामांचा खोळंबा होतो यासाठी आपण खालील गावात नवीन ग्रामपंचायत इमारती बांधकाम करण्यात येणार आहे अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे मंजूर झालेल्या ग्रामपंचायती मंठा तालुक्यातील कटाळा खुर्द २० लक्ष, ठेंगे वडगाव २० लक्ष, पोखरी केंधळे २० लक्ष, माळकिनी २० लक्ष रामतीर्थ २०लक्ष, हनवत खेडा २० लक्ष ,केहाळ वडगाव २० लक्ष, गुळखंड २० लक्ष टोकवाडी २० लक्ष टाकळ खोपा २० लक्ष, तळतोंडी २० लक्ष, पाडळी दुधा २०लक्ष, पांगरा गडदे २० लक्ष लावणी २० लक्ष निंबे वडगाव २० लक्ष विरेगव्हाण २० लक्ष, वाघोडा तांडा २०,लक्ष, सोनुनकरवाडी २० लक्ष, दहिफळ खंदारे २० लक्ष पांगरी बुद्रुक २० लक्ष , शिवनगिरी २५ लक्ष, हेलस २०, परतूर तालुक्यातील अंगालगाव २०लक्ष अंगालगाव २० ,आसनगाव , सावरगाव बुद्रुक २० लक्ष, माव पाटोदा २०लक्ष रु चांगतपुरी २० लक्ष, फुलवाडी २०लक्ष, मापेगाव बुद्रुक २० लक्ष डोलारा २० लक्ष तर जालना तालुक्यातील नेर शिवली भागातील शंभू सावरगाव २० लक्ष सोनदेव २० लक्ष रुपये निधी प्राप्त झाला असून लवकरच या ग्रामपंचायत इमारत कार्यालयाची बांधकाम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

# बदामराव पंडितांनी घेतली पंकजाताईंची भेट

## निवडणुकीसह मतदारसंघातील कामांबाबत चर्चा

**गेवराई । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुंबई येथे भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसह गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध कामांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती माजी सभापती युधाजित पंडित यांनी दिली.**



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश घेण्यात आलेला आहे. या प्रवेशानंतर पहिल्यांदाच मुंबई येथे राज्याच्या पशुसंवर्धन पर्यावरण आणि हवामान बदल कॅबिनेट मंत्री तथा भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजाताई मुंडे यांची माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये गेवराई नगर परिषद आणि पंचायत समितीसह जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी, त्यासोबतच गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भाजपा पक्ष संघटन बांधणी यासोबत शहरासह ग्रामीण भागात भागातील पदाधिकाऱ्यांना बळ आणि स्वाभिमान देण्याच्या संदर्भातही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती माजी सभापती युधाजित पंडित यांनी दिली असून, या बैठकीतून भाजप पक्ष विस्तार आणि जनतेच्या सेवेसाठी नवी ऊर्जा निश्चित मिळाल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# पान १ वरून...

### राज्यातील दोन कोटी कुटुंबांच्या

हा कायदा शहरी भागासाठी लागू नव्हता. मात्र वाढत्या नागरीकरणामुळे लोकांनी शहराच्या किंवा गावांच्या सभोवताली असलेल्या क्षेत्रांमध्ये त्यांच्या गरजेपोटी, या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रांचे खरेदी-विक्री व्यवहार केले. राज्यात अशा तुकड्यांची संख्या सुमारे ४९ लाख इतकी आहे. तुकडेबंदी कायद्याविरुद्ध झालेले हे अनियमित व्यवहार नियमित करण्यासाठी शासनाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी अध्यादेश प्रसिद्ध केला असून, अंमलात आला आहे.

**नोंदणीकृत केलेली सगळी नावे सातबारावर येणार**

या अध्यादेशाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, दि. १५ नोव्हेंबर, १९६५ पासून ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंतच्या तुकड्यांचे झालेले हस्तांतरण (व्यवहार) आता कोणतेही शुल्क न आकारता विनामूल्य 'मानीव नियमित' करण्यात येणार आहेत. ज्या तुकड्यांची खरेदी-विक्री नोंदणीकृत केलेली आहे, मात्र त्या खरेदीदारांची नावे ७/१२ उताऱ्यावर आलेली नाहीत, त्यांची नावे आता ७/१२ उताऱ्यामध्ये मालकी हक्कामध्ये घेण्यात येतील. तर, ज्या लोकांनी असे व्यवहार अनोंदणीकृत दस्तऐवजांद्वारे केलेले आहेत, त्यांनी आता सब-रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणी करून, त्यांची नावे ७/१२ उताऱ्यामध्ये मालकी हक्क सदरी घेता येतील.

----------

### पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देता

पुढे ते आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हणतात की, दुबार मतदार नोंदणीपासून, ते मतदार यादीतील अनेक घोळ या सगळ्यावर प्रश्न विचारल्यावर जर निवडणूक आयोगाला एकही उत्तर देता येत नसेल किंवा द्यायची इच्छा नसेल तर तुमचा उपयोग काय? जबाबदारी तर तुम्ही केंव्हाच झटकली आहे, आत्ता उत्तरदायित्व पण नाकारणार, मग तुमच्या पदांचे करायचे काय ? असा सवालही राज ठाकरे यांनी केला आहे. महाराष्ट्रातील जनतेने ही क्लिप जरूर पहावी, तुमच्या मतदानाचा ढळढळीत अपमानाचा उगम कुठून आहे हे तुम्हाला कळेल. असे राज ठाकरे यांनी म्हटले असून, निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेची क्लिप त्यांनी शेअर केली आहे. दरम्यान, या पत्रकार परिषदेत प्रश्न विचारून निवडणूक आयोगाची भंबेरी उडवणाऱ्या पत्रकारांचे त्यांनी मनापासून अभिनंदन आणि कौतुकही केले आहे.

--------

### नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला

करावे लागणार आहे. या निवडणुकांमध्ये उमेदवारांसाठी आधुनिक सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांना आता ऑनलाईन नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. संबंधित संकेतस्थळावर नामनिर्देशनाची माहिती भरून, ती आयोगाकडे सादर करता येणार आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. राज्यातील या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३७६ मतदार आहेत. मतदानासाठी १३ हजार ३५५ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

----------

### अनुदान घोटाळा: २८ आरोपी

आहे. जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्या साठी ग्रामस्थरीय अधिकारी (तलाठी, ग्रामसेवक,ग्रामविस्तार अधिकारी) यांना पिक निहाय स्थळ पाहणी पंचनामे करुन त्या प्रमाणे यादया तयार करुन त्या यादया तहसिल कार्यालयास इ मेल वर अपलोड कराव्या. तहसिल कार्यालयातील नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ग्रामस्थरीय अधिकारी यांनी पाठवीलेल्या यादयाची खात्री करुन त्या शासनाने दिलेल्या महा डी बी टी या पोर्टलवर अपलोड करणे अपेक्षीत होते. तहसिल कार्यालयाकडुन यादया अपलोड झाल्यानंतर जिल्हाधकिारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत सदर यादया मधील शेतकरी यांचे व्हि के नंबर अॅप्रुअल दिल्या जात होते. व्हि.के.नंबर मिळाल्यानंतर शेतकऱ्यानी इ केवायसी केल्यानंतर त्यांना त्यांनी दिलेल्या बॅक खात्यावर अगर आधारकार्डला जोडलेल्या बॅक खात्यावर शासनाकडुन डायरेक्ट अनुदान प्राप्त होत होते. मात्र अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबधत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर पतर घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात सत्यता पडताळणी साठी चौकशी समीती गठीत केली होती. चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये ₹२४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे. सदर गुन्हयात यापुर्वी पाच आरोपी अटक केलेले आहे. सदरील गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना तांत्रीक विश्लेषनाअधारे व गोपणीय माहीती अधारे आज रोजी सहावा आरोपी रामेश्वर गणेश बारहाते रा. शेवगा ता. अंबड हा अकोला शहर जिल्हा अकोला येथे गोपणीय ठिकाणी राहत असल्याची माहीती मिळाल्याने आर्थिक गुन्हे शाखेचे पथक जालना येथुन निघुन अकोला येथे पोहचले व मिळालेल्या माहीती प्रमाणे खदान पोलीस ठाणे अकोला शहर यांची नियमा प्रमाणे पोलीस मदत घेऊन आरोपीचा शोध घेतला आरोपी मिळुन आल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस मा. न्यायालया समोर हजर करण्यात आले मा.न्यायालयाने दोन्ही पक्षाची बाजु ऐकुण घेतल्यानंतर आरोपीची ०७ दिवसाची पिसीआर मंजुर केली आहे. सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

-----------

### आचारसंहिता लागल्याने काही

किंवा इतर कल्याणकारी योजनांच्या घोषणांबाबत निवडणूक आयोगाच्या आदेशात स्पष्ट नमूद आहे की, निवडणुका जाहीर झाल्यानंतर असे सर्व मनाई आदेश तात्काळ लागू होतात. केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तारुढ पक्षांनी विविध कल्याणकारी योजना, सवलतींची घोषणा करून किंवा सार्वजनिक निधीतून मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे शासनाच्या कामगिरीचा ठळकपणे प्रचार करून कोणत्याही पक्षाच्या प्रचाराला चालना देण्यासाठी अधिकाराचा दुरुपयोग करता येणार नाही. अशा कृत्यांवर कडक बंदी आहे. फक्त नैसर्गिक आपत्तीच्या स्थितीत मदत देण्याची मुभा आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनासारख्या नियमित योजनांचे वितरण निवडणूक कालावधीत स्थगित राहील. ही योजना महाराष्ट्र शासनाची लोकप्रिय कल्याणकारी योजना आहे, ज्यात पात्र महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते. मात्र, आचारसंहितेच्या काटेकोर पालनामुळे हे पैसे सध्या थांबवले जातील. निवडणूक संपल्यानंतर आणि नवे प्रशासन स्थिर झाल्यानंतरच योजनेचे वितरण पुन्हा सुरू होईल, असे सांगण्यात येत आहे.

----------

### भारतात दोन देश एक श्रीमंतांचा

घ्या, पण परीक्षेच्या दोन दिवस आधी पेपर लीक होतो. सरकारकडे रोजगार निर्माण करण्याची इच्छाच नाही. असे बिहार आम्हाला नको आहे. आता संविधान वाचवले नाही, तर फक्त मोदी-अदानी-अंबानीच उरतील. राहुल गांधी पुढे म्हणाले की, सरकारच्या विमा योजनांचा उपयोग आता शेतकऱ्यांकडून पैसे गोळा करून खासगी कंपन्यांना देण्यासाठी केला जातो. मोदीजी छठ पूजेत स्वतःसाठी स्वच्छ पाणी मागवतात, पण सामान्य बिहारींना यमुनेच्या दूषित पाण्यात स्नान करावे लागते. हेच त्यांचे लोकशाहीचे तत्त्व आहे. नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीमुळे बिहारच्या युवकांचे रोजगार गेले. आज परिस्थिती अशी आहे की, नोकरी नसल्यामुळे तरुण 'रील्स' बनवत आहेत. जर तुम्ही देशातील ५०० सर्वात मोठ्या कंपन्यांची यादी केली तर तुम्हाला मागासलेले, सर्वात मागासलेले, दलित, महादलित किंवा आदिवासी समुदायातील लोक सापडणार नाहीत. या कंपन्यांमध्ये काम करणारे लोक १०% लोकसंख्येतून येतात. न्यायव्यवस्था असो किंवा नोकरशाही, त्यांनाच सर्वत्र स्थान मिळते. जर आपण देशाच्या विकासात देशातील ९०% लोकसंख्येला सहभागी करून घेतले नाही, तर आपण असा भारत निर्माण करू, जिथे सर्व संपत्ती फक्त २-३ लोकांच्या हातात असेल, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

------------

### आचारसंहितेपूर्वी सरकार गतिमान!

यामध्ये सर्वाधिक शासन आदेश नगर विकास विभागाचे असून, ते जवळपास ५१ आदेश आहेत. यामध्ये पशुसंवर्धन दहा, सहकार व पणन तीन, कौशल्य विकास एक, वित्त विभाग दोन, अन्न व नागरी पुरवठा विभाग चार, सामान्य प्रशासन तीन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दोन, उद्योग वर्ष विभाग एक, विधी व न्याय विभाग तीन, वैद्यकीय शिक्षण तीन, नियोजन विभाग आठ, सार्वजनिक आरोग्य विभाग चार, महसूल व वन विभाग आकरा, ग्राम विकास विभाग चार, शालेय व शिक्षण विभाग पाच, सामाजिक न्याय विभाग सहा, पर्यटन व सांस्कृतिक विभाग दोन, आदिवासी विभाग दोन, नगर विकास विभाग एकावन्न, मृदसंधारण साथ जलसंपदा विभाग तीन, पाणीपुरवठा विभाग एक, गृह विभाग सात आणि इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण नऊ, अशी एकूण १४४ शासन आदेश एकाच दिवशी जारी केले आहेत.

## थोडक्यात...



### वैष्णवी ढोबळेची महाराष्ट्र संघात निवड

आष्टी : टेंभुर्णी (ता. माढा, जि. सोलापूर) येथे जय भवानी माध्यमिक आश्रमशाळेत ११ व १२ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या ४४ व्या महाराष्ट्र राज्य शूटिंगबॉल अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत आष्टी येथील महेश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजची कु. वैष्णवी ढोबळे हिने १९ वर्षाखालील मुलींच्या गटात उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र संघात निवड मिळवली आहे.आता ती उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील शूटिंगबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. कु. वैष्णवी राजाभाऊ ढोबळे हिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार भीमरावजी धोंडे साहेब, संचालक डॉ. अजय (दादा) धोंडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा सागर वाघुले , प्रा. शिवदास विधाते, प्राचार्य डॉ. सतीश रागीट, प्राचार्य संजय बोडखे विभागप्रमुख डॉ. चित्रा राऊत , प्रा.गणेश धोंडे, प्रा. गर्जे राणी,प्रा. लक्ष्मण डोने, प्रा. संदीप धोंडे

प्रा. सुनिल खिळदकर चेअरमन बाळासाहेब शिंदे, रमेश शिंदे सर, , शारीरिक शिक्षण संचालक डॉ. खेमगर सर, प्रा.राजाभाऊ ढोबळे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे मन:पूर्वक अभिनंदन करून आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छादिल्या



### सेवा भारतीतर्फे नफरवाडी येथे ६९ शेतकऱ्यांना हरभरा बियाण्यांचे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या देवगिरी प्रांताच्या वतीने सेवा भारती विभागातर्फे पाटोदा तालुक्यातील नफरवाडी गावात सामाजिक बांधिलकी जपत ६९ शेतकऱ्यांना हरभरा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थानिक स्वयंसेवकांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. अलीकडील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक आधार मिळावा, तसेच पुन्हा शेती कार्यात उभारी मिळावी हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे स्वयंसेवकांनी सांगितले.या कार्यक्रमास गावातील शेतकरी, ग्रामस्थ तसेच सेवा भारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांना या मदतीमुळे दिलासा मिळाला असून, त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. गावकऱ्यांनी सेवा भारतीच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि अशा सामाजिक कार्यामुळे ग्रामीण समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.

### मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात स्नेहमेळावा संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयातील २००५- ०६ च्या १० वी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि.२६ आक्टोबर रविवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींने शाळेच्या संपूर्ण परिसरात वृक्षारोपण केले. २० वर्षानंतर झालेल्या या स्नेह मेळाव्यात अनेक जुन्या आठवणींना विद्यार्थ्यांनी उजाळा दिला.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले विद्यालयाने दिलेले संस्कार आम्ही जीवनभर विसरू शकत नाही. गुरुंनी दिलेली शिस्त, चिकाटी,सचोटी यामुळेच आम्ही जीवनात घडलो अशी कृतज्ञता व्यक्त करत स्नेह मेळावा पार पडला. या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम घडवून आणल्यामुळे एकमेकांच्या भावना एकमेकांपर्यंत पोहोचल्या असून यातून विचारांची आदान प्रदान झाली,या स्नेह मेळाव्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो अशा उपस्थित मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके, प्रविण घोडके व गुरुजनांनी शुभेच्छा दिल्या. या स्नेह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, विद्यार्थिनीने परिश्रम घेतले.

### खुशी लगडचा वाढदिवस आनंदग्राममध्ये साजरा

पात्रूड । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील तेलगाव येथील युवा उद्योजक अण्णासाहेब लगड यांची मुलगी खुशी लगड हिचा नववा वाढदिवस आनंदग्राम (इंन्फट इंडिया) दि.१ शनिवार रोजी जाऊन मुलांना नवीन कपडे आणि फराळ वाटून साजरा केला. तेलगावचे युवा उद्योजक अण्णासाहेब लगड हे सामाजिक भान राखत विविध उपक्रम राबवत असतात. त्यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसासाठी इतरत्र खर्च न करता तो आनंदग्राम अनाथालयातील (इंन्फट इंडिया) ३५ मुलांवर खर्च करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला. या मुलांना नवीन गणवेश आणि फराळ देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी आनंदग्राम अनाथालयाच्या डॉ. जाग्रती बारगजे मॅडम, खुशी लगडचे आई-वडील आणि मामा धनंजय घायतिडक उपस्थित होते.अण्णासाहेब लगड यांच्याया उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गोदा पात्रात अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा पकडले ; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्याचे उच्चाटन करण्यासाठी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले असून दिनांक ३ नोव्हेंबर रोजी गोदावरी नदी पात्रात अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा स्थानीक गुन्हे शाखेने पकडले यातील साठ हजार रुपये किमतीच्या वाळू सह ५० लाख रुपये किमतीचे टिप्परही जप्त करण्यात आले.




दिनांक ३ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की गोदावरी नदी पात्रात अवैध वाळू वाहतूक होणार आहे. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर पोलीस हवालदार वरपे, राठोड, राहुल शिंदे यांच्या पथकाने दिनांक ४ नोव्हेंबर रोजी रात्री एक वाजता तलवाडा फाटा व नागझरी गावच्या परिसरात जाऊन विनापरवाना बेकायदेशीर रित्या वाळू वाहतूक करणारे दोन हायवा गोदावरी नदी पात्रात वाळू भरून कुठेतरी घेऊन जात असताना आढळून आले. या पथकाने हायवाच्या चालकांना थांबण्याचा इशारा केल्यानंतर अंधाराचा फायदा घेत हायवा चालक हायवा थांबवून अंधारात पळून गेले. हायवा क्रमांक एम. एच.२३/ ए.यु.२७५७ व एम. एच.२५/ए.जे. ३५५५ हे दोन्ही हायवा किमान पाच पाच ब्रास वाळू भरलेले होते. हे दोन्ही हायवा ६०००० रुपये किमतीच्या वाळू सह जप्त करण्यात आले. या दोन हायवा ची किंमत जवळपास ५० लाख रुपये आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात हायवा चालक आणि मालका विरुद्ध दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार वर्पे, राठोड, राहुल शिंदेयांनीकेली.

## श्रीकांत होरमाळेने राज्यसेवा परीक्षेत १४० वी रँक मिळवत मिळवले यश

दिंद्रुड । प्रतिनिधी

बारावीला तिनदा नापास नापास झाला, दोन वर्ष घरची शेतीही केली, अकरा वर्षांपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेचा घराबाहेर पडत सराव व अभ्यास केला.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेत धारूर तालुक्यातील संगम येथील सुपुत्राने १४० वी रँक मिळवत वर्ग एक अधिकारी होण्यास पात्र ठरला. संगम सह पंचक्रोशीतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



श्रीकांत दत्तात्रय होरमाळे हा माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड जवळील संगम या छोट्याशा गावचा तरुण गेल्या अकरा वर्षांपासून पुण्यात राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास करत होता. इयत्ता बारावीपर्यंत ढ समजला जाणारा विद्यार्थी श्रीकांत बारावीच्या परीक्षेत तीनदा नापास झाला होता. आपण शैक्षणिक क्षेत्रात काहीच करू शकत नाहीत या मनोधारणेने दोन वर्ष घरची शेती श्रीकांत ने केली. आपला भाऊ गणेश याच्या मार्गदर्शनाने व समुपदेशनाने त्याने राज्यसेवा आयोगाची परीक्षा क्रॅक करायचे ठरवले. तीन वेळेस त्याला अपयश आले मात्र खचून न जाता तो अभ्यास करू लागला. यावर्षीच्या मे महिन्यात राज्यसेवा आयोगाची परीक्षा दिल्यानंतर नुकताच त्याचा निकाल लागला अन् अख्खे संगम गाव श्रीकांतला डोक्यावर घेऊन नाचू लागले, तो राज्यात १४० वी रँक मिळवत उत्तीर्ण झाला होता. वर्ग १ चा अधिकारी म्हणून तो आता शासकीय नोकरीत रुजू होणार आहे. एक्साईज डीवायएसपी, सहाय्यक राज्यकर आयुक्त,गट विकास अधिकारी,यापैकी एका पदावर श्रीकांत लोकसेवा करण्यासाठी नोकरी करणार आहे. माझ्या गावाची व माझ्यावर प्रेम करणाऱ्या पंचक्रोशीची मला सेवा करायची आहे. अडल्यानडल्यांची प्रामाणिक पणे कामे करायचे आहेत असे श्रीकांत सांगतो. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी श्रीकांतला शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

## युसूफवडगावच्या रागिनी खंडेलवालचे एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील रागिणी अविनाश खंडेलवाल ने नुकत्याच जाहिर झालेल्या एमपीएससी परिक्षेच्या निकालात घवघवीत असे यश संपादन करून क्लास वन अधिकाऱ्याची पोस्ट मिळवली आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने २०२४/२५ च्या परीक्षाचा निकाल जाहिर केला असुन यामध्ये युसूफवडगांवची सुपुत्री व सध्या अंबाजोगाई नगरपरिषदेत करनिर्धारण पदी कार्यरत असणाऱ्या रागिणी खंडेलवालने आहे ती नोकरी सांभााळत व मेहनत,जिद्द चिकटी व अभ्यासाच्या जोरावर दुसऱ्या प्रयत्नात त्यांनी ईडब्ल्यूएस मुलीं मधुन ऑल महाराष्ट्र मधुन ५ वी रँक मिळवत महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण होऊन क्लास वन अधिकाऱ्याची पोस्ट मिळवली आहे याबद्दल तिचे आई-वडील बहिण भाऊ व गावकरी यांच्याकडून कौतुक करण्यात येत आहे.तसेच युसूफवडगांव मधील ती पहिली अशी मुलगी आहे जिने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन क्लासवन अधिकाऱ्याची पोस्ट मिळवली आहे.

## श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या पायी दिंडीचे आगमन

**बीड प्रतिनिधी**

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या चोवीसव्या पायी दिंडीचे तमलूर-मदनापुर येथून श्री क्षेत्र कपिलधार येथे आज भव्य आगमन झाले. या आगमनाने कपिलधार नगरी भक्तीमय झाली असून सर्वत्र मन्मथ स्वामी की जय!, गुरुदेव की जय! या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.



भक्तीचा महासागर ओसंडून वाहिला

श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या दिंडीचे कपिलधार येथे आगमन होताच भाविकांनी पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.

मन्मथ मुक्तीधाम मठ ते श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी समाधी स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत सवाद्य मिरवणूक, फुलांच्या पाकळ्यांची उधळण, अतिशबाजी, आणि गुरूविषयी अपार आदरभाव दिसून आला.

मार्गात भक्तांनी महाराजांच्या पायावर फुलांची पखरण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

दिंडीमध्ये भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

दूरदूरच्या गावांमधून हजारो भाविकांनी या दिंडीत सहभागी होण्यासाठी उपस्थिती दर्शवली. मिरवणुकीत स्त्री-पुरुष, युवा व वृद्धांनी भक्तिगीतांच्या तालावर नृत्य करत वातावरण मंगलमय केले.दिंडीमध्ये चालणारे जय मन्मथ स्वामी, हर हर शिवाचार्य अशा घोषांनी वातावरण अधिकच पवित्र झाले.

पाद्यपूजा व पुष्पवृष्टी

श्री मन्मथ स्वामी समाधी स्थळी पोहोचल्यावर श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

गुरुवर्यांनी समाधीस्थळावर मस्तक टेकवून मन्मथ स्वामींना वंदन केले व सर्व भक्तांसाठी आशीर्वाद दिला.या प्रसंगी महाराजांनी भक्तांशी संवाद साधत गुरूभक्ती, साधना आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

अभूतपूर्व स्वागताने महाराज भावुक

गुरुवर्यांच्या स्वागतासाठी कपिलधार ग्रामस्थ, मठातील सेवक व स्थानिक भक्तांनी विशेष तयारी केली होती.

संपूर्ण कपिलधार नगरी फुलांनी, पताकांनी व शुभ्र रांगोळीने सजवण्यात आली होती.

या अभूतपूर्व स्वागताने शिवाचार्य महाराज भावुक झाले. त्यांनी समाधान व्यक्त करत सांगितले,भक्ती आणि प्रेम हेच आमचे खरे वैभव आहे. मन्मथ स्वामींच्या कृपेने हे पवित्र स्थळ अधिक तेजोमय होईल.

समारोप व आशीर्वचन

कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांनी सर्व उपस्थितांना आशीर्वचन दिले आणि समाजात धर्म, सदाचार आणि एकतेचा संदेश देत प्रसंगी उपस्थित राहिलेल्या भाविकांचे आभार मानले. यावेळी मठ परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

पान ६ वरून...

### जिल्ह्यातील साखर कारखान्यांपेक्षा

आर्थिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न होईल.

या सोबतच सीएनजी गॅस निर्मिती प्रकल्प उभा करण्याचा संचालक मंडळ विचार करीत आहे. हा प्रकल्प निर्मितीसाठीचा प्रस्ताव केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असून केंद्र शासनाच्या गॅस निर्मितीच्या धोरणानुसार या प्रकल्पास मोठ्या सबसीडीसह लवकरच मान्यता मिळेल. यावर्षीचा गळीत हंगाम सुरु करण्यापूर्वी हा प्रकल्प सुरू करण्यात येवून पुढे ऊस वाहतुकीसाठी गॅसवर चालणा-या ट्रक मधुनच ऊस गाळपासाठी आणण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत असल्याचे व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांनी सांगितले.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये ऊसाचे उत्पादन वाढीसाठी यापुढे प्रयत्न करणार आहोत. एआय - कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादन वाढीसाठी त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे यापुढे हा कारखाना सक्षमपणे चालविणार आहोत असे सांगून व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांनी आपल्या सर्वांचे सहकार्य व मदतीने अंबा कारखान्याला गतवैभव प्राप्त होईल असा विश्वास व्यक्त करुन सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास गाळपाकरीता पुरवावा यावा अशी विनंती व आवाहन केले. या कार्यक्रमात हभप भगवान महाराज वरपगावकर यांनी मंत्र पठण करुन या गळीत हंगाम यशस्वी होण्यासाठी इश्वराकडे आवाहन केले तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आपला ऊस गाळपासाठी देण्याची विनंती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक राजाभाऊ औताडे यांनी केले तर आभार कार्यकारी संचालक डी. एन. मरकड यांनी केले. कारखान्याच्या गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमासाठी केज-अंबाजोगाई तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी, शेतमजूर, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड नाळवंडी रस्त्याच्या

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढवणाऱ्या इच्छुक उमेदवारांची यावेळी दमछाक होण्याची दाट शक्यता आहे. तसेच लोकप्रतिनिधींना सूचना देऊन देखील निवडणुकांच्या काळात लोकप्रतिनिधी गाव स्तरावरती मते मागायला येणार असतील तर त्यांना या ठिकाणचे ग्रामस्थ निषेध म्हणून काळे झेंडे देखीलदाखवणारआहेत.

### पाटोदा तहसिल कार्यालयात

८० शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करण्यात आली.

तालुक्यातील एकूण ५४,८३२ खातेदारांपैकी ३२,८९२ शेतकऱ्यांची नोंदणी आतापर्यंत पूर्ण झाली असून सुमारे ८७.९० टक्के काम पूर्ण झाले आहे.मात्र स्थलांतरित शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने काही ठिकाणी नोंदणीला तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. पाटोदा तालुक्यातील ६२ गावांमधील ६१ हजारांहून अधिक शेतकरी अतिवृष्टीच्या तडाख्यात बाधित झाले. हेक्टरी १०८०० रुपये प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास दिवाळीच्या दिवशी सुरुवात झाली.पण ई-केवायसी व फार्मर आयडी अपूर्ण असल्याने अनेकांना अद्याप मदतीपासून वंचित राहावे लागले. या स्थितीकडे लक्ष देत आमदार सुरेश धस यांनी स्वतः आढावा बैठक घेऊन प्रशासनाला तातडीने सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.त्यांच्या पुढाकारानंतर मागील काही दिवसांत कामकाजाला गती मिळाली आहे. गुरुवारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या भेटीदरम्यान तहसीलदार दत्तात्रय निलावाड,नायब तहसिलदार तथा मुख्याधिकारी अभयकुमार जोशी,नायब तहसीलदार बाळकृष्ण मोरे,अव्वल कारकून श्रीनिवास मुळे,उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख,कृषी अधिकारी ओंकार शेळके तसेच महसूल विभागातील अधिकारी उपस्थित होते.पाटोदा शहरातील सर्व सेतू केंद्रे सुरू राहिली तसेच तहसील कार्यालयात याद्या अपलोड करण्याचे काम अखंड सुरू होते.या दिवशी नायब तहसीलदार अभयकुमार जोशी,बाळासाहेब मोरे, अव्वल कारकून श्रीनिवास मुळे,महसूल सेविका श्रीमती खाडे,तलाठी सौ.दिपालीताई लांडगे,भाग्यश्री सांगळे, नाईक,उबाळे,जाधव तसेच इतर महसूल कर्मचारी दिवसभर कार्यरत राहिले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन शेतकऱ्यांच्या संपर्कात राहून प्रत्येक शेतकऱ्याची नोंदणी पूर्ण होईपर्यंत प्रयत्नशील आहे. शासनाने दिलेल्या मदतीचा लाभ कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये यासाठी महसूल विभाग पूर्ण क्षमतेने काम करत आहे.शनिवारी सुट्टीच्या दिवशीदेखील आमचे सर्व कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहून नोंदणीचे काम सुरू ठेवले.शेतकऱ्यांनी शक्य तितक्या लवकर फार्मर आयडी आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी अशी आम्ही सर्वांना विनंती करतो. असे नायब तहसिलदार अभयकुमार जोशी म्हणाले.

## भोगलवाडी सर्कलमध्ये गोरख आबा पुर्णे यांना उमेदवारी देण्याची गरज -नागरगोजे

### विरोधकांची हवा गुल करण्यासाठी गोरख आबाच ठरतील पावरफुल

वडवणी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील भाजपा लोकसभेचे अनुसुचित जाती जमातीचे बीड जिल्हा अध्यक्ष भाजपा गट प्रमुख तथा बुथ प्रमुख श्री गोरख (आबा) पुर्णे हे पहिल्या पासुनच भाजपाचे व मंत्री पंकजाताईंचे निष्ठावंत त्यामुळे भोगलवाडी सर्कल अनुसुचित जमातीला सुटल्यामुळे भाजपा श्री गोरख पुर्णे यांना उमेदवारी देणार का कारण त्यांनी भाजपा कडुन तयारीही सुरु केलेली असुन या भागातील नागरीकांची देखिल पुर्णे

यांनी केलेल्या कामाची भाजपाने दखल घेऊन पक्ष श्रेष्ठीणी त्यांना भाजपाचे तिकिट देणे गरजेचे आहे

भोगलवाडी सर्कलमध्ये गोरख आबा पुर्णे शिवाय दुसरा प्रभावी उमेदवार कोणीच





नसून विरोधकांना घाम फोडणारा हा चेहरा जनतेच्या देखील मनात असून विरोधकांना धूळ चारण्यासाठी एकमेव उमेदवार पावरफुल ठरू शकतो

असा सक्षम आणि कार्यक्षम उमेदवार जर ताईसाहेबाच्या गटात असेल तर दुसरा कोणाचा विचार करण्याची गरजच नाही गोरख आबा कडे दांडगा अनुभव असून अनेक निवडणूका त्यांनी जवळून पाहितल्या असल्याने सर्व खाच खळगे त्यांना माहीत असल्याने ताईसाहेबांनी देखील त्यांचा विचार करणे गरजेचे आहे अन्यथा भविष्यात चुकीचा उमेदवार देऊन या भागातील उमेदवाराचा पराभव झाला तर नवल नको वाटायला.

वर्षानुवर्ष समाजातील सर्व घटकांमध्ये जाऊन लोकांचे प्रश्न ऐकून ते सोडवण्याचे प्रयत्न केले. त्यांचा हाच अनुभव आणि जनसंपर्क त्यांच्याबद्दल असलेला जनतेच्या मनातील विश्वास आणि आपुलकी उमेदवारिचा पाया ठरणार आहे. असा विश्वास अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. पंकजाताई नी गोरख आबा पुर्णे यांना उमेदवारी देऊन निष्ठावंतांना न्याय द्यावा अशी मागणी भाजपा युवा मोर्चा सोशल मिडिया चे तालुकाध्यक्ष अंकुश नागरगोजे यांनी केली आहे.

## बहुजन मुक्ती पार्टीच्या प्रभारीपदी किरण चव्हाण

**बीड । प्रतिनिधी**

आगामी होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये बहुजन मुक्ती पार्टी ही बीड जिल्ह्यातील होत असलेल्या सर्व नगरपालिका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये आपले उमेदवार उतरवणार असून या निवडणुकीची जबाबदारी किरण चव्हाण यांच्याकडे देण्यात आली आहे. गेली अनेक वर्षापासून समाज सेवेमध्ये असलेले तथा ओबीसी क्रांती परिषद च्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांच्या मदतीला धावून जाणारे, विविध प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षाचे पदे भूषवलेले नेतृत्व म्हणून किरण चव्हाण यांची समाजात ओळख आहे. २०३० च्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपणारा महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी, शोषित पीडित वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सध्या होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका फार महत्त्वाच्याअसून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन जी मेश्राम साहेब यांचे विचार तळागाळात पोहोचवून या निवडणुकीत ईव्हीएम हटाव देश बचाव तसेच महाराष्ट्रातील व देशातील जनगणना ही जातीनिहाय झाली पाहिजे या प्रमुख मुद्द्यावर आपण निवडणुकीला सामोरे जाणार असून सर्व निवडणुका ताकदीने लढणार असल्याचे मत बहुजन मुक्ती पार्टीचे युवा प्रकोष्ट प्रदेशाध्यक्ष माननीय दीपक भाऊ शिंदे यांनी व्यक्त केले.

# बिद्रीचा उच्चांकी ३,६१४ रुपये ऊसदर जाहीर

## शेतकरी संघटनांच्या आंदोलनाला यश, अवघ्या आठवडाभरात दरात बदल

कोल्हापूर । प्रतिनिधी

बिद्री (ता. कागल) येथील श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याने चालू २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी सुधारित ऊस दर जाहीर केला आहे. त्यांनी प्रतिटन एकरकमी ३,६१४ रुपये ऊसदर देण्याचा निर्णय घेतला आहे. हा दर राज्यातील सर्वाधिक दर असल्याचे कारखान्याकडून सांगण्यात आले आहे.

याआधी आठ दिवसांपूर्वी बिद्री कारखान्याने प्रतिटन ३,४५२ रुपये विनाकपात पहिली उचल जाहीर केली होती. पण हा दर एफआरपीपेक्षा कमी असल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे होते. गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूर ऊस पट्ट्यात ऊसदरावरुन आंदोलन सुरु आहे. ऊसदरावरून सोमवारी शेतकरी संघटना आणि कारखान्यांचे प्रतिनिधी यांच्यात जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली बैठक निष्फळ ठरली होती. बिद्री कारखान्याला ३,५५२ रुपये एफआरपी असताना त्यांनी ३,४५२ रुपये पहिली उचल जाहीर केली. हे नियमबाह्य असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केला होता.



दरम्यान, बिद्री कारखान्याने आम्हाला प्रतिटन ३,६०७ रुपये एफआरपी बसत असून आम्ही त्याहून अधिक म्हणजे ३,६१४ रुपये ऊसदर जाहीर केला असल्याचे म्हटले आहे. याबाबत कारखाना कार्यस्थळावर आयोजित पत्रकार परिषदेत थेट मुंबईतून कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील सहभागी झाले होते. यावेळी उपाध्यक्ष मनोज फराकटे आणि संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी सुधारित ऊस जाहीर करण्यात आला. बिद्री साखर कारखान्याने स्थापनेपासूनच ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी एक घट्ट नाते जोडले आहे. नेहमीच उच्चांकी ऊसदर देण्याची परंपरा कायम ठेवत या वर्षीही कारखान्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या असल्याचे सांगण्यात आले आहे. ऊसदर जाहीर करताना के. पी. पाटील यांनी मुंबईतून बोलताना सांगितले की, ''बिद्रीने आजवर शेतकऱ्यांच्या विश्वासावर चाललेली प्रगती कायम ठेवली आहे. भविष्यातही बिद्री कारखाना कोणत्याही परिस्थितीत मागे राहणार नाही. अवकाळी पाऊस, उत्पादन खर्चातील वाढ, ऊसतोड मजूर टंचाई अशा आव्हानांनंतरही बिद्रीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत दर निश्चित केला आहे. ''शेतकऱ्यांचे पाठबळ हेच बिद्रीची ताकद आहे. याच पाठबळावर बिद्रीची यशस्वी घोडदौड पुढेही सुरू राहील. आमचे उद्दिष्ट केवळ साखर उत्पादन नव्हे, तर शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे हे आहे.'' असे त्यांनी नमूद केले.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१७ : इंग्रज व दुसरे बाजीराव यांच्या लढाईत इंग्रजांकडून बाजीरावाच्या सैन्याचा पराभव झाला.

१८२४ : अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले.

१८४३ : विष्णुदास अमृत भावे स्वरचित सीता स्वयंवर या मराठीतील पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे सदर केला.

१८७२ : महिलांना मतदानाचा अधिकार नसताना अमेरिकेत सुसान अँथनी या महिलेने मतदान केल्यामुळे तिला १०० डॉलर दंड करण्यात आला.

१८९५ : जॉर्ज बी. सेल्डेन यांना ऑटोमोबाइलसाठी पहिले अमेरिकेचे पेटंट भेटले.

१९२९ : जी. आय. पी. रेल्वे कंपनीने मुंबईहून पुण्यापर्यंतच्या लोहमार्गावरून आगगाड्याऐवजी विजेवर चालणा-या गाड्यांचा प्रारंभ केला.

१९४० : फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा निवडून आलेले. एकमेव राष्ट्रपती आहेत.

१९४५ : कोलंबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९५१ : बी. बी. सी. आय.रेल्वे आणि सौराष्ट्र रेल्वे, राजपुताना रेल्वे, जयपूर रेल्वे व कच्छ रेल्वे यांचे विलिणीकरण करुन पश्चिम रेल्वे ची स्थापना करण्यात आली.

२००६ : इराकचे माजी अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

२००७ : गुगलने ने अँडरॉइड मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमचे अनावरण केले.

२०१३ : भारताने मंगळ ऑर्बिटर मोहिमेची सुरूवात केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७० : स्वातंत्र्य चळवळीतील नेते चित्तरंजन दास यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून १९२५)

१८८५ : अमेरिकन इतिहासकार व तत्त्वज्ञ विल डुरांट यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८१)

१८९२ : इंग्रजी-भारतीय अनुवांशिक आणि जीवशास्त्रज्ञ जे. बी. एस. हलदाणे यांचा जन्म. (मृत्यू: १ डिसेंबर १९६४)

१९०५ : भारतीय लेखक आणि कवी सज्जनद झहीर यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९७३)

१९०८ : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. राजा राव यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै २००६ ऑस्टिन, न्यू जर्सी, यु. एस. ए.)

१९१३ : ब्रिटिश अभिनेत्री विवियन लेह यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै १९६७)

१९१७ : स्वातंत्र्यसैनिक व हरयाणाचे मुख्यमंत्री बनारसी दास गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट २००७)

१९२१ : ललित कलादर्श ह्या नाट्यसंस्थेचे प्रमुख व संगीत नाटक कलावंत व गायक भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.

१९२९ : गीतकार व सर्जनशील कवी प्रा. योगेश्वर अभ्यंकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर २०००)

१९३० : भारतीय नेते अर्जुनसिंह यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च २०११)

१९३२ : पक्षी, वन्याजीवनविषयक ग्रंथकार मारुती चितमपल्ली यांचा सोलापूर येथे जन्म.

१९५२ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक वंदना शिवा यांचा जन्म.

१९५५ : पत्रकार करन थापर यांचा जन्म.

१९८८ : क्रिकेटपटू विराट कोहोली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७९ : प्रकाश हा विद्युत चुंबकीय तरंगांनी बनलेला असतो असा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक व गणितज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेल यांचे निधन. (जन्म: १३ जून १८३१ एडिंबर्ग, यु. के.)

१९१५ : राष्ट्रीय सभेचे संस्थापक व मुंबईचा सिंह उर्फ फिरोजशहा मेरवानजी मेहता यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८४५)

१९५० : चतुरंग गवई फय्याझ खाँसाहेब यांचे निधन.

१९९१ : कथालेखिका व कादंबरीकार शकुंतला विष्णू गोगटे यांचे निधन.

२०११ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांचे निधन. (जन्म: ८ सप्टेंबर १९२६)

# अधिक उत्पादन देणारे गव्हाचे वाण; जाणून घ्या वैशिष्ट्ये!



शेतकऱ्यांचे कृषी उत्पादन उत्पन्न वाढावे यासाठी वेगवेगळ्या जाती विकसित करण्यात येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेगवेगळ्या पिकांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती प्रसारित केल्या आहेत. गहू हे राज्यासहित संपूर्ण देशभरात उत्पादित होणारे एक महत्त्वाचे अन्नधान्य पीक आहे. धान म्हणजे भातासारखेचं गव्हाचेही आपल्या भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरातसहित देशातील अनेक राज्यांमध्ये गव्हाचे उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्रातही पश्चिम महाराष्ट्र सहित सर्वत्र गव्हाची लागवड नजरेस पडते. यामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जात आहेत. देशातील शास्त्रज्ञांच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी प्रयत्न होत आहेत. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून देशातील शास्त्रज्ञांनी अलीकडेच गव्हाची एक नवीन जात विकसित केली आहे. गव्हाची ही जात भारतीय कृषी संशोधन संस्था, प्रादेशिक केंद्र, इंदूर यांनी विकसित केली आहे. या गव्हाच्या सुधारित जातीची थोडक्यात माहिती आणि वैशिष्ट्ये जाणून घेऊ या.

गव्हाची नवीन जात : गव्हाच्या या नवीन जातीचे नाव आहे 'एचआय १६६५' म्हणजे 'पुसा शरबती. गव्हाची ही नवीन जात वेळेवर पेरणी करण्यासाठी शिफारशीत करण्यात आली आहे. मर्यादित सिंचन परिस्थितीमध्ये या जातीची लागवड करता येणे शक्य आहे.

एचआय १६६५ गव्हाची वैशिष्ट्ये : ही जात विशेषतः द्वीपकल्पीय आणि मध्य भारतासाठी शिफारसीत आहे. या जातीच्या गव्हाची उंची ८५-९० सेमी असल्याचे आढळून आले आहे आणि १००० दाण्यांचे वजन ४४ ग्रॅम असल्याचे आढळून आले आहे. ही जात काळा आणि भुरा तांबेरा रोगास प्रतिकारक आहे. गव्हाची ही जात ११०-११५ दिवसांत तयार होते. उत्पादन क्षमतेबद्दल बोलायचे झाल्यास, ही जात ३३.० क्विंटल/हेक्टरपर्यंत (मर्यादित सिंचन परिस्थितीत) उत्पन्न देऊ शकते. पण संभाव्य धान्य उत्पादन ४३.५ क्विंटल/हेक्टर इतके आहे.

# गाई- म्हशिंच्या डोळ्यातून पाणी येत असल्यास दुर्लक्ष करू नका !

गाईच्या डोळ्यातून पाणी येणे म्हणजे एक साधं लक्षण वाटतं, पण त्यामागे अनेक गंभीर कारणं दडलेली असू शकतात. वेळेवर उपचार न केल्यास गाईच्या आरोग्यावर, उत्पादनक्षमतेवर आणि शेवटी शेतकऱ्याच्या उत्पन्नावरही परिणाम होऊ शकतो. डोळ्यांतून पाणी येण्याची कारणे : डोळ्यात धूळ, परगळी, काड्या-कचरा गेलेला असणे. डोळ्यांमध्ये काही परकं कण गेल्यास गाईला अस्वस्थ वाटते आणि डोळ्यातून सतत पाणी वाहू लागते. डोळ्यांचा संसर्ग : डोळे लालसर होतात, सुजतात, आणि पाणी येतं. हा संसर्ग एकापासून दुसऱ्याला होऊ शकतो. इन्फेक्शनमुळे डोळा दुखणे अशा स्थितीत डोळ्याच्या आतील भागात इन्फेक्शन झाल्यामुळे डोळा पाणावतो. काही वेळा फुफ्फुसात किंवा नाकात कृमी असतील, तर त्याचा त्रास डोळ्यांतून पाणी येण्यामार्फत दिसू शकतो.

माशी-मच्छर यांचा त्रास : डोळ्याभोवती माशा सतत बसल्यामुळे डोळ्यात जंतू जातात आणि त्यामुळे डोळे पाणावतात. टिक किंवा दुसरे परजीवी डोळ्याभोवती असणे, ह्यामुळे इरिटेशन होऊन पाणी वाहू शकते. ॲलर्जीक प्रतिक्रिया : काही नवीन खाद्यपदार्थ, गोठा स्वच्छ नसेल, रसायनांचा संपर्क यामुळे डोळ्यांची ॲलर्जी होऊन पाणी येऊ शकते.अशी आहेत लक्षणे : डोळ्यातून पाणी सतत येणे, डोळा सुजलेला/लालसर दिसणे, डोळ्याजवळ चोळणे किंवा डोकं झाडांना घासणे, डोळा अर्धवट बंद ठेवणे, खाण्याचा/दूध देण्याचा रुचीत बदल होणे.

उपाय आणि काळजी : प्राथमिक स्वच्छता करा. स्वच्छ पाण्याने डोळे हलक्या हाताने धुवा. गरज असल्यास स्वच्छ सुती कापड वापरा. व्हेटरिनरी डॉक्टरांचा सल्ला घ्या. डोळ्यांतून पाणी २ दिवसांपेक्षा जास्त येत असेल, तर डॉक्टरांकडून तपासणी करून औषधं सुरू करा. गोठा स्वच्छ ठेवा. धूळ, माशा, टिक यापासून संरक्षण होईल.

माशी नियंत्रण उपाय करा. नेहमी कीटकनाशक फवारणी, लोळण औषध यांचा वापर करा. आहारात सुधारणा करा. डोळ्यातून पाणी येणं हे एका मोठ्या त्रासाचं पूर्वलक्षण असू शकतं. त्यामुळे ते वेळीच ओळखणं, योग्य उपचार करणं आणि गोठा स्वच्छ ठेवणं ही शेतकऱ्यांची जबाबदारी आहे.



# लिंबूनीच्या झाडांना लीफ मायनर कीटकांचा धोका

देशातील शेतकऱ्यांचा फळबागा लागवडीकडे कल वाढत चालला आहे. आधुनिकीकरणामुळे फळबागांमध्ये पहिल्या तंत्राच्या तुलनेत आता जास्त कष्ट करण्याची गरज भासत नाही. कारण आधुनिक यंत्रामुळे औषध फवारणी आणि मशागत करणे सोपे झाले आहे. आधुनिक यंत्राद्वारे ही कामे केली जात असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसाही वाचत आहे.

खरे तर बागायती पिके ही शेतकऱ्यांसाठी नगदी पिके आहेत. त्यांची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. या भागात गेल्या काही वर्षांत लिंबूचे उत्पादन शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे. लिंबू हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी सोपे मानले जाते. परंतु, ते फायदेशीर करण्यासाठी, शेतकर्यांनी अनेक खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये लीफ मायनर कीटक शेतकऱ्यांसाठी लिंबू रोपासाठी आवश्यक आहे. तसे न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंग यांच्या मते, लिंबाची रोपटी लहान असताना त्या काळात लिंबूवर्गीय पानावरील किरकोळ लिंबूवर्गीय कीटक दिसून येतो. ते म्हणाले की, ही एक प्रमुख कीड असून मार्च ते नोव्हेंबरपर्यंत सक्रिय राहते. लिंबू, संत्रा आणि पोमेलो यांसारख्या लिंबूवर्गीय फळांच्या गटाचे ते नुकसान करते.

ते म्हणाले की लिंबूवर्गीय लीफमायनर अळ्या लिंबाच्या झाडांच्या कोवळ्या पानांमध्ये उथळ बोगदे किंवा खोबणी बनवून स्वतःला खातात. कीटक



सामान्यतः संत्री, मँडरीन, लिंबू, पेपरमिंट्स, द्राक्षे आणि इतर वनस्पतींवर आढळतात. लिंबूवर्गीय लीफमायनर ही एकमेव खाण कीटक आहे. जे सहसा लिंबू (लिंबूवर्गीय) पानांवर हल्ला करतात.

या किडीची लक्षणे कशी ओळखावीत : लिंबूवर्गीय लीफमायनर हा एक अतिशय लहान, हलका रंगाचा कीटक आहे, जो १/४ इंचापेक्षा कमी लांबीचा आहे. यात तपकिरी आणि पांढर्या खुणा असलेले चांदीचे आणि पांढरे इंद्रधनुषी अग्रभाग आणि प्रत्येक पंखाच्या टोकावर एक वेगळा काळा डाग आहे. मागचे पंख आणि शरीर पांढरे असून मागचे पंख मार्जिनपासून पसरलेले आहेत. कीटकांच्या अळ्या फक्त लिंबाच्या पानांच्या खोडांमध्ये आणि इतर जवळच्या वनस्पतींमध्ये आढळतात, जसजशी अळी विकसित होते तसतसे ते पानाच्या पृष्ठभागावरून खाली वाहणाऱ्या शिरांच्या आत एक पातळ विष्ठा सोडते, एक पातळ रेषा म्हणून दिसते. ही विशेषता कीटक ओळखण्यात मदत करण्यासाठी वापरली जाते.

कीटक जीवन चक्र : लिंबूवर्गीय लीफमिनरच्या जीवनाच्या चार अवस्था असतात ज्यात अंडी, अळ्या, प्यूपा आणि प्रौढ कीटक यांचा समावेश होतो. प्रौढ वनस्पतींना हानी पोहोचवत नाहीत आणि फक्त १ ते २ आठवडे जगतात. प्रौढ पतंग पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी सर्वात जास्त सक्रिय असतात आणि दिवसभर पानांच्या खालच्या बाजूला विश्रांती घेतात, परंतु क्वचितच दिसतात. प्युपल केस सोडल्यानंतर लगेच, मादी कीटक लैंगिक फेरोमोन उत्सर्जित करते जे नर कीटकांना आकर्षित करते. संभोगानंतर, मादी यजमान पानांच्या खालच्या बाजूला एकच अंडी घालते. झाडावर, फ्लश ग्रोथची नवीन उगवलेली पत्रके विशेषतः पसंतीची ओवीपोझिशन साइट आहेत.

किडींच्या हल्ल्यामुळे पाने सुकतात : लिंबूवर्गीय पानांची खाण लिंबूवर्गीय पिकांमध्ये अळ्या म्हणून जगू शकते. मोठी लोकसंख्या असल्याशिवाय, कडक झालेली जुनी पाने संवेदनाक्षम होत नाहीत. अळ्या नव्याने उगवलेल्या पानांच्या खालच्या किंवा वरच्या पृष्ठभागामध्ये प्रवेश करतात, ज्यामुळे ते वळण आणि विकृत होतात. या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडतात, सुकतात आणि शेवटी फांद्यावर पडतात किंवा सुकतात. लिंबूवर्गीय कॅन्कर, जिवाणूजन्य रोगामुळे खाण दुखापती संसर्गाचे केंद्र म्हणून काम करतात.

या किडीचे नियंत्रण कसे करावे : देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते, शेतकऱ्यांनी या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने गोळा करून नष्ट करावीत. पावसाळ्यात बाधित भागांची छाटणी करावी. वारंवार सिंचन आणि नायट्रोजन खतांचा जास्त वापर टाळा. अळ्या खाणीच्या आत असल्याने कीटकनाशकांच्या वापराने त्यांना सहज मारता येत नाही. तथापि, काही पद्धतशीर कीटकनाशकांच्या वापरामुळे संसर्ग काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

# नोव्हेंबर महिन्यात तूर पिकावरील एकात्मिक नियंत्रण



सध्या तूर पिकात फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था सुरु आहे. या काळात पिकावर वेगवेगळ्या किडीं आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडी आणि रोगांचे वेळीच नियंत्रण केले नाही तर पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जाणून घेऊ एकात्मिक नियंत्रण उपाय.

तूर पिकाचे कीड आणि रोग व्यवस्थापन : पीक फुलोऱ्यापासून ते शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत असताना तूर पिकाला आवश्यकतेनुसार आणि उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. रसशोषक आणि इतर किडींचा अंदाज घेऊन प्रति हेक्टरी ५ याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी ''टी'' आकाराचे पक्षी थांबे प्रति हेक्टरी ५० ते ६०. उभारावेत. तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. तुरीत वांझ रोगाचा प्रसार कोळी किडीमार्फत होतो म्हणून त्याच्या नियंत्रणासाठी ॲझाडीरॅक्टिन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी किंवा पाण्यात विरघळणारे गंधक (८० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत घाटेअळी/पसारी पतंग आणि फळमाशीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा ॲझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५० मिलि किंवा इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ४.४ मिलि किंवा क्लोरॲन्ट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एससी) २ ते ३ मिलि प्रति १० लिटर पाणी फवारणी करावी. तूर पिकात तृणधान्याचे आंतरपीक घेतल्यास किडींचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते. एच.एन.पी.व्ही. या जैविक कीडनाशकाचा वापर करावा.

## थोडक्यात



### दोन जणांचा बुडून मृत्यू

परभणी। प्रतिनिधी

परभणी येथून कंदुरी कार्यक्रमासाठी शिरुरी (ता. सोनपेठ) येथे गेलेल्या दोन तरुणांचा गोदावरी नदी पात्रात बुडून मृत्यू झाला. सोफीयानन शेख जावेद (१६) आणि रऊफ खान करीम खान (२६, दोघे रा. महात्मा गांधी नगर, धाररोड, परभणी) ही मृतांची नावे आहेत.

पोहण्यासाठी उतरल्यावर पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. हे दोघे नातेवाइकांसह शिरुरी येथे कंदुरी कार्यक्रमासाठी गेले होते. दोघेही गोदावरी नदीपात्राकडे पोहण्यासाठी गेले. परंतु तेथील पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. घटनेची माहिती मिळताच महसूल आणि पोलिस प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तहसीलदार सुनील कावरखे, पोलिस निरीक्षक अशोक गिते, तलाठी हरकळ, महसूल कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली होती. दरम्यान, रविवारी स्थानिक भोई समाजातील नागरिकांच्या मदतीने सोफियान शेख याचा शोध घेऊन त्याला तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. तर दोन दिवसांच्या शोध मोहिमेनंतर दुसरा तरुण याचा मृतदेह गंगोखडजवळ पात्रात सापडला. या घटनेमुळे शिरुरी आणि परभणी परिसरात शोककळा पसरली. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना नदी, तलाव किंवा खोल पाण्याच्या ठिकाणी पोहण्यासाठी उतरू नये, अशा सूचना दिल्या आहेत.

### ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत रेशन दुकानदार ठार

हिंगोली । प्रतिनिधी



हायवा ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत तोंडापूर येथील रेशन दुकानदाराचा जागीच मृत्यू झाला. संतोष थोरात (वय ४९) असे अपघातातील मृताचे नाव आहे. ही घटना वारंगा-दांडेगाव रस्त्यावर वारंगा फाटा शिवारात घडली. तोंडापूर येथील रेशन दुकानदार संतोष थोरात हे दुचाकी क्र. (एम.एच २६ ए.क्यू ०१७८) या दुचाकीवरून वारंगा फाट्यावरून आपल्या गावी जात होते. यादरम्यान वारंगा फाट्याकडे येणाऱ्या हायवा ट्रक क्र. (एम एच २६ एच ७९४२) या ट्रकची वारंगा-दांडेगाव रस्त्यावर वारंगा फाटा शिवारात दुचाकीला धडक बसली. या अपघातात संतोष थोरात गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णवाहिकेने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हायवा ट्रक ताब्यात घेतला असून ट्रक चालक फरार आहे.

### दिवसाढवळ्या तरुणाचा खून

पुणे। प्रतिनिधी

मित्रासोबत थांबलेल्या एका तरुणाचा दिवसाढवळ्या धारधार शस्त्राने वार करून खून करण्यात आला. ही घटना मंगळवारी दुपारी सव्वा तीन वाजताच्या सुमारास बाजीराव रस्त्यावरील महाराणा प्रताप उद्यानाजवळ दखनी मिसळच्या समोर घडली. मयंक खरारे (वय.१७) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे दरम्यान, घटनेची माहिती मिळताच खडक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. खून झालेला तरुण हा आंबीलओढा कॉलनी परिसरात राहण्यास असल्याची माहिती आहे. खरारे आणि त्याचा मित्र असे दोघेजण दुचाकीवरून निघाले होते. त्यावेळी बाजीराव रस्त्यावरील महाराणा प्रताप उद्यानाजवळी दखनी मिसळच्या समोर आले असता, मास्क लावलेले तिघेजण पाठीमागून आले. त्यांनी दिसताक्षणी खरारे याच्यावर शस्त्राने वार केले. हल्ल्यात तो गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थील रक्ताचा सडा पडला होता. तर आरोपींनी हत्यार जागेवरच सोडून पळ काढला.

ॲड. व्ही. एस. गुंड.
निशाणी – ४३.

**जाहिर नोटीस**

**मे. जिल्हा न्यायाधीश-२ संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२१.**

**नामदेव विठोबा कचरे –अर्जदार**

विरुध्द
भामाबाई सुखदेव ठोसर–सा. वाला.
प्रति,

सा. वाली नं. १. भामाबाई सुखदेव ठोसर, रा. मनोली, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, सा. वाली नं. ३अ. चंद्रकला पुंजा आहेर, सा. वाला नं. ३ब. कैलास पुंजा आहेर, सा. वाला नं. ३अ व ३ब दोघे रा. दत्तावाडी, घुलेवस्ती, वरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे, सा. वाली नं. ३ड. निलुताई त्रंबक बगाडे, रा. बगाडे वस्ती, वरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे. सा. वाला नं. ५ शिवाजी बापु आहेर, रा. नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे. ज्याअर्थी आपणांस जाहिर नोटीस करणेत येते की, यापुर्वी आपणांस वेळोवेळी नोटीस काढण्यात आल्या असून आपण नोटीस घेण्याची टाळाटाळ करीत आहात.

याद्वारे तुम्हास जाहिर नोटीस देणेत येते की, या न्यायालयात आपणांविरुध्द किरकोळ अर्ज दाखल झाला असून आपल्याला या अर्जात जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १७/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा. या न्यायालयात समक्ष हजर राहुन निवेदन करावे. तुम्हास अशीही नोटीस देणेत येते की, वर दिलेल्या तारखेच्या दिवशी आपण उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. तसेच वर नमूद केलेल्या दिवशी किंवा तत्पुर्वी बजावणी करता तुमचा पत्ता दाखल करणेत कसूर केल्यास तुमचा बचार रद्द केला जाणेस पात्र ठरेल.

आज दि. ०४/११/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

**तयार करणार**
**स्वाक्षरित**
**एस. के. गाडेकर,**
**व. लिपीक.**

**हुकूमावरुन**
**स्वाक्षरित**
**(एस. व्ही. शिवरात्री)**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, संगमनेर.**

# सामाजिक न्याय मंत्र्याच्या जिल्ह्यात मतिमंद मुलांना मारहाण

## शिपाई अन् केअरटेकरच्या राक्षसी वर्तनाचा संतापजनक प्रकार

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मांडकी गावातून एक अंगावर शहारे आणणारा प्रकार समोर आला आहे. जिल्ह्यातील चैतन्य कानिफनाथ निवासी मतिमंद विद्यालयात काही केअरटेकर आणि शिपाई यांनी मतिमंद विद्यार्थ्यांवर बेदम मारहाण केल्याचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. कुकरच्या झाकणांनी, लाथा-बुक्क्यांनी या निरागस लेकरांना केल्याचा प्रकार प्रकाशात आला असून, या अमानवी कृत्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात संताप व्यक्त केला जात आहे. विद्यार्थ्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचं सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर त्याच्यावरही गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

देवाने निरागसता दिलेली, पण नियतीने दु:ख दिलेली ही लेकरं ज्यांना आपली वेदना शब्दांत सांगता येत नाही, अशा विद्यार्थ्यांवर माणुसकी हरवलेल्या केअरटेकरांनी अत्याचार केले. 'एबीपी माझा'च्या हाती लागलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये हे दृश्य स्पष्ट दिसत आहे. विद्यार्थ्यांना आधार



देणारे हातच जर त्यांना तुडवत असतील, तर समाज म्हणून आपण कुठे जात आहोत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या अमानवी वागणुकीत दोन कर्मचाऱ्यांची नावे समोर आली आहेत दीपक इंगळे आणि प्रदीप देहाडे. दीपक इंगळे हा गेल्या १० वर्षांपासून या विद्यालयात शिपाई म्हणून कार्यरत आहे. त्याने एका विद्यार्थ्याला कुकरच्या झाकणाने मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्याला निलंबित करण्यात आलं असून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो संस्थाचालकाचा नातेवाईक असल्याची माहितीही समोर आली आहे. तर, प्रदीप देहाडे हा देखील दहा वर्षांपासून या संस्थेत काळजीवाहक म्हणून काम करत होता. विद्यार्थ्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचं सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर त्याच्यावरही गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

### पोलीस आणि प्रशासनाची कारवाई

या घटनेनंतर शहरातील चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रविकिरण दरवडे यांनी सांगितले की, या दोन्ही कर्मचाऱ्यांविरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू आहे. संस्थेतील इतर कर्मचारी आणि व्यवस्थापनाचीही चौकशी केली जात आहे.

## एजंटच्या भूलथापांना बळी पडू नका ; धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाचा इशारा!

पुणे। प्रतिनिधी

बऱ्याचदा धर्मादाय रुग्णालयांच्या आवारात काही व्यक्ती एजंट असल्याचे भासवून रुग्णांची आर्थिक लूट करण्याचा प्रयत्न करतात. बिलाची रक्कम कमी करण्यासाठी, उपचार योजनेमध्ये बसवण्यासाठी धर्मादाय सहआयुक्त कार्यालयामार्फत मदत करण्याचे आश्वासन देतात आणि पैसे घेऊन पसार होतात, अशा स्वरूपाच्या तक्रारी धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर एजंटच्या भूलथापांना बळी न पडण्याचे आवाहन धर्मादाय सहआयुक्त कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

काही एजंट किंवा दलाल रुग्णालयाशी संबंधित असल्याचे भासवून रुग्णांकडून आर्थिक व्यवहार करत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाने इशारा जारी केला आहे. या कार्यालयाचा व रुग्णालयासंबंधीच्या एजंटचा कुठलाही



संबंध नाही. सर्व रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी याची नोंद घ्यावी. तिसऱ्या इसमाच्या भूलथापांना बळी पडून स्वतःचे आर्थिक नुकसान करून घेऊ नये, अशा स्पष्ट सूचना फलक कार्यालयात लावण्यात आला आहे. अलीकडे काही रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही व्यक्ती रुग्णालयातील उपचार, सल्ला मसलत किंवा दाखल प्रक्रिया वेगात पूर्ण करून देण्याचे आमिष दाखवत पैसे घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आर्थिक नुकसान होत असल्याने कार्यालयाने सर्वसामान्यांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. रुग्णालय प्रशासनाने या प्रकारांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्याचे ठरवले असून, परिसरात सूचना फलक लावले जाणार आहेत. रुग्ण आणि नातेवाइकांनी अधिकृत शुल्काशिवाय कोणालाही पैसे देऊ नयेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. या कारवाईमुळे रुग्णालय परिसरातील बेकायदेशीर एजंटांची मुस्कटदाबी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


कोणत्याही रुग्णालयाशी संबंधित अधिकृत प्रक्रिया थेट रुग्णालयाच्या प्रशासनामार्फतच पार पडतात. यामध्ये कोणत्याही एजंटचा किंवा बाहेरील व्यक्तीचा सहभाग नसतो. त्यामुळे अशा लोकांच्या आमिषाला बळी पडू नये आणि संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित संबंधित प्रशासन अथवा पोलिसांकडे तक्रार करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## मतदार याद्यांमध्ये ६० हजार दुबार नावे? तक्रारींनंतर प्रशासनाकडून पडताळणी सुरू

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार नावे असल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. जिल्हा प्रशासनाकडे आतापर्यंत गंगापूर, पैठण आणि फुलंब्री या तीन विधानसभा मतदारसंघातील सुमारे ६० हजार नावांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारी संबंधित मतदान नोंदणी अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आल्या असून, सध्या त्याची पडताळणी सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने आवश्यक प्रक्रिया सुरू केली आहे. महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपरिषद व नगरपंचायतींची प्रभाग रचना अंतिम केली आहे. सध्याच्या मतदारयाद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार नावे असल्याचे आरोप होत आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनकाडे लेखी स्वरूपात तक्रारीही दाखल झाल्या आहेत. जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त माहितीनुसार, आतापर्यंत तीन तक्रार



अर्ज सादर झालेले असून, त्यासोबत मतदारांची नावेही जोडण्यात आली आहेत.

पैठण विधानसभा मतदारसंघात २५ हजार दुबार नावे असल्याची पहिली तक्रार आहे. दुसरी तक्रार गंगापूर विधानसभा मतदारसंघातील नावांबाबत असून, तिथे तब्बल ३६ हजार नावे दोन दोन वेळा असल्याचे म्हटले आहे. तर फुलंब्री विधानसभा मतदारसंघातही २२०० दुबार नावे असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तिन्ही तक्रारी मतदान नोंदणी अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आल्या असून, त्यांना पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार आता घरोघरी जाऊन बीएलओंकडून ही पडताळणी होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## सरपंचाच्या पतीचा कारभार चव्हाट्यावर

मंठा (प्रतिनिधी)खोराड सावंगी ता.मंठा येथील सरपंचाच्या पतीचा कारभार चव्हाट्यावर आला असून सरपंच सौ.मिलन श्रीराम जाधव यांचे पती श्रीराम जाधव हे सरपंचाच्या खोट्या सह्या करून बळजबरी चेकद्वारे पैसे उचलत असल्याची तक्रार खुद्द ग्रामपंचायत अधिकारी व्ही.आर.आढे यांनी गटविकास अधिकारी यांच्या कडे लेखी निवेदन देऊन केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,खोराड सावंगी येथील सरपंच सौ.मिलन श्रीराम जाधव यांचे पती श्रीराम जाधव हे भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आहेत.ते विद्यमान आमदाराचे नाव घेऊन माझ्यावर दबाव टाकून मला म्हणतात की,मी सांगेन ते तू करावे लागेल आणि नाही केले तर मी तुला सस्पेंड करून टाकेल असे म्हणून शिवीगाळ करत आहेत.

वरील सरपंचाचे पती श्रीराम जाधव हे सरपंचाचे खोट्या सह्या करून पैसे हडप

### सरपंच पत्नीच्या पतीकडून खोट्यासह मारून उचलतात पैसे

करत आहेत. श्रीराम जाधव यांच्या वागणुकीमुळे मि त्रस्थ झालो असून आज रोजी त्यांच्याकडे चेक बुक व एम.बी.पुस्तिका असून माझ्यावर दबाव टाकून श्रीराम जाधव यांनी चेक वर माझी सही घेतली आहेत.याची संपूर्ण चौकशी व्हावी तसेच यासाठी आपण सरपंच सौ मिलन जाधव व त्यांचे पती श्रीराम जाधव यांच्या मूळ हस्तक्षराची चौकशी करावी म्हणजे सत्य समोरील तसेच

दोषी विरुध्द कार्यवाही करावी व अशा दमदाटी व शिवीगाळ करणाऱ्या सरपंच यांचे विरुध्द फौजदारी दाखल करण्यात यावी नसता मला दुसरा सज्जा देण्यत यावा.असे निवेदनात म्हंटले आहे

## जालना शहरातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत –जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जालना शहरात वाढत्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम होत असून अनेकांना विविध आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहे. या प्रदुषणाचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर होत आहे. त्यामुळे जालना शहरातील प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयता करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी आशिम मित्तल यांनी बैठकीत सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जालना शहरातील प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व जालना जिल्हा स्टोल असोसिएशनचे प्रतिनिधी यांच्या आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी मनिष होळकर, उप प्रादेशिक अधिकारो दिपक बनसोड, क्षेत्र अधिकारी रवि



जाधव जालना जिल्हा स्टील असोसिएशनचे सर्व प्रतिनिधी वआणि उद्योजकता संस्था (), आयआयटी मुंबईतील तंत्रज्ञान प्रवर्धन केंद्राचे इंद्रकांत झा यांची उपस्थिती होती.

श्रीमती मित्तल म्हणाल्या की. जालना शहरातील प्रक्षणाचो समस्या अधीक असून, शहरातील प्रदूषण नियंत्रणासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरातोल सर्व नागरिक, स्थानिक उद्योग आणि प्रशासनाने एकत्र येऊन पुढाकार घेतल्यास यावर नक्कीच नियंत्रण आणता येईल. याकरीता सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. यावेळी जालना शहरातील स्टील असोसिएशनच्या पतीने प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी औद्योगिज वसाहतीमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपाययोजना याबाबत माहिती देण्यात आली. तसेच यावेळी नवोपक्रम आणि उद्योजकता संस्था, आयआयटी मुंबईतील तंत्रज्ञान प्रवर्धन केंद्राचे इंद्रकांत झा यांनी सद्यस्थिर्तत औद्योगिक वसाहतीमध्ये प्रदुषण कर्मा करण्यासाठी संशोधनात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात असे सुचविले.

# पालवण ते लिंबागणेश १३ कोटींच्या रस्त्याची दुर्दशा

## बेशरम कंत्राटदार आणि प्रशासनाचा खड्ड्यात बेशरमांची झाडे लाऊन निषेध

लिंबागणेश। प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील पालवण चौक ते लिंबागणेश या २४ कि.मी. लांबीच्या रस्त्यावर तब्बल १२ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. मात्र, राजकीय नेत्यांचे निकटवर्तीय असलेल्या मदन मस्के कन्स्ट्रक्शन कंपनीने सुरुवातीपासूनच अंदाजपत्रकाकडे दुर्लक्ष करून निकृष्ट दर्जाचे डांबर, वाळू-खडीचे चुकीचे प्रमाण वापरल्याने रस्ता काही महिन्यांतच उखडला आहे. या कंपनीच्या हायवा ट्रकांद्वारे मोठ्या प्रमाणात खडी वाहतूक होत असल्याने रस्ता खचला असून, जागोजागी खोल खड्डे आणि भगदाड पडले आहेत. पावसाळ्यात हा रस्ता दलदलीत परिवर्तित झाला आहे. त्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी



लागत असून विद्यार्थी, रुग्ण आणि प्रवासी नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या दुर्दशेबद्दल संतप्त ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला खड्ड्यांमध्ये बेशरम झाडे लावून "बेशरम कंत्राटदार आणि प्रशासनाचा" विरोध व्यक्त करण्यात आला. या निषेधावेळी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, शंकर वाणी, बेलगाव सरपंच जाधव,दादासाहेब गायकवाड, सुदाम गिरे,रामदास मुळे, नवनाथ मुळे, गणेश तागड, महावीर मुळे,विनायक खिल्लारे, श्रीमंत वायभट, अशोक खिल्लारे, आप्पासाहेब वायभट ,जिवन कापसे,शिवाजी वायभट, राजेंद्र गिते,सुदाम रणखांब, उद्धव रणखांब,रामराज मुळे, अर्जुन भिसे, विक्रम भोसले , विनायक खिल्लारे,आश्रुबा तागड, ईश्वर शिंदे, गोरख मुळे, सर्जेराव मुळे ,दादा मुळीक, प्रविण मुळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. ढवळे म्हणाले की, "तत्कालीन ग्रामविकास मंत्री व विद्यमान पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सन २०१५ ते २०२१-२२ दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तब्बल १९३३ कि.मी. लांबीचे व १९८६ कोटी रुपयांचे रस्ते ग्रामीण भागासाठी मंजूर केले होते. पण हे रस्ते ग्रामस्थांच्या सोयीसाठी नव्हे, तर राजकीय नेते, कंत्राटदार आणि काही अधिकाऱ्यांना पोसण्यासाठीच होते, हे आता प्रत्यक्ष अनुभवाने स्पष्ट झाले आहे. बालाघाटावर लिंबागणेश आणि चौसाळा सर्कल मधील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेली कामे राजकीय लोकांच्या नातेवाईकांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांशी आर्थिक साटेलोटे करत करण्यात आली असल्याने अत्यंत निकृष्ट दर्जाची असुन तक्रारीनंतर सुद्धा कारवाई करण्यात येत नाही संबंधित कंत्राटदार आणि प्रशासकीय आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी यासाठी भविष्यात मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा बाळासाहेब मोरे पाटील यांनी दिला आहे.

# जिल्ह्यातील साखर कारखान्यांपेक्षा सर्वाधिक भाव अंबा साखर देणार-आडसकर

## चेअरमन रमेश आडसकर यांची ग्वाही

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील साखर कारखान्यांपेक्षा सर्वाधिक भाव अंबा साखर देणार अशी ग्वाही अंबासाखरचे चेअरमन रमेश आडसकर यांनी दिली. अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२५ वर्षाच्या गळीत हंगामाचा प्रारंभ आज चेअरमन रमेश आडसकर, व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील, संचालक राजाभाऊ औताडे, हभप भगवान महाराज वरपगावकर यांच्या मोळी टाकून हस्ते करण्यात आला. यावेळी चेअरमन रमेश आडसकर बोलत होते.

आपल्या विस्तारीत भाषणात चेअरमन रमेश आडसकर यांनी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर म्हणाले की, अंबा साखर उभारणीच्या काळात या भागात कारखाना मंजुरीसाठी ३ प्रस्ताव होते. परंतु, तीन जिल्ह्यांचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून १९६९ साली अंबा साखरची सुरूवात झाली. कारखान्यास यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. मागील ५० वर्षांमध्ये या कारखान्याने अनेक चढउतार पहिले आहेत. तसेच आपण अनेक अडचणींना सामोरे ही गेलेलो आहोत.

या कारखान्याचे दिवंगत संस्थापक मा.ज्ञानोबारावजी पाटील साहेब व संस्थापक माजी आमदार बाबुरावजी आडसकर साहेब, भगवानराव बापू लोमटे, आनंदराव बापू चव्हाण, ॲड.चेवले साहेब यांच्यासह सहकाऱ्यांनी लावलेल्या या सहकाराच्या रोपट्यामुळे या भागात सहकार चळवळीला बळकटी मिळाली. तसेच या परिसराच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी मोठी मदत ही झाली. साखर कारखानदारी दर तीन ते चार वर्षांत दुष्काळाला सामोरे जाते. त्यामुळे गाळपात सातत्य राहत नाही व हा उद्योग



हंगामी चालत असल्यामुळे वेळोवेळी कारखानदारी समोर आर्थिक अडचणी ही उभ्या राहतात.

अशा परिस्थिती मध्ये अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना टिकला पाहिजे यासाठी माझे सन २००९ पासूनच प्रामाणिक प्रयत्न राहिलेले आहेत. यावर्षी राज्य व केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांच्याकडून खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन ८० कोटी रूपये मंजूर करून घेतले. यातून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, सांगली, पतसंस्था, शुगरकेन डेव्हलपमेंट फंड, नवी दिल्ली या संस्थांची एक रकमी परत फेडीनुसार थकित देणे देण्यात आली. तसेच थकीत तोडणी वाहतूक करार, थकीत प्रॉव्हिडंट फंड व महावितरणच्या थकलेल्या रकमेसह या सर्व रकमा कारखान्याने अदा केल्यामुळेच व उर्वरित रकमेचा उपयोग ही या कारखान्याची जुनी झालेली यंत्रणा व बॉयलर, मिल, टर्बाईन, मशिनरीची देखभाल दुरूस्ती व काही प्रमाणात मशिनरीचे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे.

आवश्यक बांधकाम, त्यामुळे ८० कोटी रूपये कर्जाचा विनियोग अत्यंत काटकसरीने व योग्य पद्धतीने करण्यात आलेला आहे. पैसे कमी पडत असल्याने व्हाइस चेअरमन दत्तात्रय आबा पाटील, संचालक राजाभाऊ औताडे व मी आम्ही मिळून वैयक्तिक पैसे एकत्र जमवून राहिलेली कामे करीत आहोत. ऊस तोडणी वाहतूक रक्कम ही अदा केली आहे. आता कारखान्यांची सर्व यंत्रणा सज्ज झाली असून गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपाचे उद्दिष्ट ठेवून त्याप्रमाणे नियोजन करण्यात आलेले असून, कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालविणार आहोत. हा कारखाना अधिक सक्षम पध्दतीने चालण्यासाठी सर्व संचालक मंडळ प्रयत्न करीत असून ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस या कारखान्यात गाळपासाठी देवून सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना कारखान्याचे व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांनी कारखान्याकडे असणारी ३० के.एल.पी.डी.असवानी प्रकल्पातील आपण रेक्टिफाइड स्पिरीटचे उत्पादन घेत होतो, मात्र यापुढे आपण इथेनॉल निर्मिती करण्याचा निर्णय आमच्या संचालक मंडळाने घेतलेला आहे. त्यामुळे काही प्रमाणात कारखान्याला आर्थिक फायदा होणार आहे. कारखान्याचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी संचालक मंडळाने को प्राडेक्टिव्ह उपक्रम सुरु करण्यावर अधिक भर दिला असून इथेनॉल प्रकल्प पुर्ण क्षमतेने सुरु करण्यात येणार आहे. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्त्या करण्यात आल्या असून यावर्षी या प्रकल्पामुळे कारखान्यांची ◀◀ पान ३ वर

# पाली येथील उद्धव ठाकरे यांच्या शेतकरी संवादास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांनी अवस्था अतिशय गंभीर झालेली आहे जमीनिमधील माती देखील वाहून गेलेली आहे, जनावरे वाहुन गेली आहेत आयुष्य कसं जगायचं असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई व हेक्टरी मदत देण्याचे व ते दिवाळीच्या पुर्वीच खात्यावर जमा करण्याचे गोड आश्वासन देऊन तुमची दिवाळी गोड करु असे महायुतीच्या या लबाड शासनाने सांगितले होते पण दिवाळी होऊनही १२ दिवस उलटले आहेत तरी अजुनही कुणाच्याही खात्यात पैसे पडलेले नाहीत या सर्व बाबींची पोलखोल करण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव साहेब ठाकरे हे बीड तालुक्यातील पाली या गावात



शेतकऱ्यांनसोबत संवाद साधण्यासाठी दि. ५/११/२०२५ रोजी दुपारी ठिक १२ वाजता येत आहेत त्यांच्यासोबत महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे , यावेळी ते शेतकऱ्यांच्या व्यथा व खरच मदत मिळाली आहे का ,हे महायुतीचे सरकार किती फसव्या घोषणा, करुन दिशाभूल करत आहे , पॅकेजचे काय झाले, हे सरकार किती दगाबाज आहे याची पोलखोल करुन शेतकरी बांधवांना अधार देणार आहेत, तरी या शेतकरी संवादास बीड जिल्हातील व तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार , महिला भगिनी,व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनीकेलेआहे.

# विठ्ठल फपाळ याचे सीए परिक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामीण भागातून व वारकरी संप्रदायात वाढ झालेला भागवताचार्य ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांचे नातू व कृषी उत्पन्न बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ यांचे चिरंजीव विठ्ठल फपाळ याने सि.ए. परीक्षेत १६८ मार्क घेत घवघवीत यश संपादन केले आहे.



माजलगाव तालुक्यातील अलापूर येथील मूळ रहिवाशी असलेला विठ्ठल फपाळ याने १० वी पासूनच सि. ए. होण्याची जिद्द उराशी बाळगुन त्याने १२ नंतर पुणे येथील सिम्बॉयसेस या कॉलेजमध्ये शिक्षण घेतले व आताच सि. ए. परीक्षेच्या (द्वितीय वर्ष)लागलेल्या निकालात घवघवीत यश संपादन केले आहे

या यशा बद्दल त्याचे आजोबा भावताचार्य ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ,तसेच ह.भ.प.पांडुरंग महाराज शितोळे, मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक, सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी मोरे, माजी सभापती नितिन नाईकनवरे,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले,सचिव हरिभाऊ सवणे,मनोहर शिंगणे यांनी अभिनंदन केले

# अजितसिंह शिंदे यांचा एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत राज्यात ५८ वा क्रमांक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा (राजपत्रित अधिकारी - गट अ) परीक्षेचा २०२४ चा निकाल जाहीर झाला असून, या परीक्षेत धनेगाव ता. केज येथील प्रा. डॉ. मधुकरराव शिंदे यांचे सुपुत्र अजितसिंह मधुकर शिंदे यांनी राज्यात ५८ वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



अजितसिंह शिंदे यांनी तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय, वारणानगर येथून स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी बी.ई.सिव्हिल संपादन केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र स्वागत होत आहे.

अजितसिंह यांच्या यशामागे त्यांचे वडील डॉ. मधुकर शिंदे, आई उषा शिंदे, तसेच बहिणी डॉ. ज्योती शिंदे व डॉ. श्वेता शिंदे यांचे प्रेम, प्रोत्साहन आणि मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मित्रपरिवाराचेही या प्रवासात भक्कम सहकार्य मिळाले. राज्यसेवा परीक्षेत ५८ वा क्रमांक मिळवून अजितसिंह शिंदे यांनी धनेगावातील पहिले क्लास-१ अधिकारी होण्याचा मान मिळवला असून संपूर्ण बीड जिल्ह्याचा अभिमान वाढवला आहे.

# पैलवान सिकंदर शेख चांगला खेळाडू; त्याच्यावरील अन्याय दूर करा!

## मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्र्यांकडे माजी आ.भीमराव धोंडे यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या आणि क्रीडा क्षेत्रातील गुणी पैलवान सिकंदर शेख याला पंजाब राज्यामध्ये कुटील डाव करून जाणीवपूर्वक अडकवले असून त्याच्यावरील हा झालेला अन्याय दूर करून यातून त्याची मुक्तता करावी व न्याय द्यावा अशी मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. माध्यमांशी बोलताना माजी आ.



भीमराव धोंडे म्हणाले की, सिकंदर शेख हा महाराष्ट्रातील अत्यंत गुणवंत पैलवान आहे. खऱ्या अर्थाने त्याच्यावर या ठिकाणी अन्याय झालेला आहे. पंजाब राज्यात कुस्तीच्या सरावासाठी तो गेलेला होता.. परंतु तेथे काही लोकांनी कटकारस्थान करून त्याच्यावर गंडांतर आणलेले दिसते. अधिक माहिती नाही; परंतु एवढे मात्र नक्की की सिकंदर शेखर स्वभावाने चांगला आहे. गरिबीत वाढलेला आहे.. वडिलांनी अक्षरशः हमाली करून त्याला पैलवानकीचे शिक्षण देण्यासाठी मोठे योगदान दिलेले आहे.एवढ्या कष्टातून पुढे आलेला सिकंदर शेख हा अशा प्रकारची शस्त्रास्त्रांची तष्करी करेल असे वाटत नाही.त्या राज्यातील अनेक मुलांना सिकंदरने मैदानात हरवलेले आहे, ही वास्तव स्थिती आहे.त्यामुळे तेथील काही लोकांनी कटकारस्थान करून त्याला गुंतवलेले दिसते.त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,क्रीडामंत्री यांनी यामध्ये विशेष लक्ष घालून सिकंदर शेख याला न्याय द्यावा, अशी मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी माध्यम प्रतिनिधीशी बोलतानायेथेदिली.

# आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.ताहेर उपाध्यक्षपदी ॲड.खिल्लारे तर सचिवपदी ॲड.पोकळे यांची अविरोध निवड


आष्टी । प्रतिनिधी

आष्टी वकील संघाची वार्षिक निवडणूक प्रक्रिया उत्साहात आणि मैत्रीपूर्ण वातावरणात पार पडली. दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण बैठकीत निवडणुकीबाबत चर्चा सुरू असताना जेष्ठ विधिज्ञांनी निवडणूक अविरोध करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने संमती दिली.यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत ॲड. सय्यद ताहेर यांची अध्यक्षपदी ॲड. बाप्पासाहेब खिल्लारे यांची उपाध्यक्षपदी ॲड. उध्दव पोकळे यांची सचिवपदी, ॲड. जे. जी. खंडागळे यांची कोषाध्यक्षपदी, तर ॲड. सोनल



केरूळकर यांची महिला प्रतिनिधी म्हणून अविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदासाठी सय्यद ताहेर यांच्या नावाची सूचना ॲड.आदिनाथ पोकळे यांनी केली.

कार्यकारिणीची घोषणा झाल्यानंतर नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व सदस्यांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या बैठकीस तत्कालीन अध्यक्ष ॲड. ए. एन. जेवे अध्यक्षस्थानी होते. निवडणूक बैठकीसाठी संघाचे जेष्ठ व कनिष्ठ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये ॲड. आर. टी.जगताप आबा, ॲड. बाबुराव अनारसे, ॲड.राकेश हंबर्डे, ॲड.पंढरीनाथ पारखे ॲड.हनुमंत शिंदे,ॲड.आदिनाथ पोकळे, ॲड.बाळासाहेब मोरे, ॲड.अविनाश निंबाळकर, ॲड.सुरेश शिंदे, ॲड. महादेव मोहिते,ॲड.इरफान शेख, ॲड.महादेव तांदळे, ॲड.रत्नदीप निकाळजे, ॲड.बाळासाहेब झांबरे, ॲड.नवनाथ विधाते, ॲड.शरद चौधरी, ॲड.बाबासाहेब घोलप, ॲड.नवनाथ शेकडे,ॲड.भोकरे, ॲड. बापूराव गर्जे,ॲड.प्रविण डोंगरे, ॲड.नलावडे, ॲड.गोविंद घुले आदींचा समावेश होता.



बीड : युवा नेते जयदत्त भैया धस यांचे वाढदिवसानिमित्त सत्कार करताना गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड साहेब व कऱ्हेवाडी ग्रामपंचायत सदस्य (छाया: शरद रेडेकर)

# रोजगार हमी योजनेतील अडथळा शेतकऱ्यांच्या मुळावर

घाटसावळी । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील कामे ठप्प झाले आहेत सिंचन विहीर गाय गोठा फळबाग इतर कामे प्रशासकीय अडथळ्यामुळे ठप्प झाले आहेत त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक फटका सहन करावा लागत आहे पूर्वी सिंचन विहिरीसाठी राज्य शासनाकडून पाच लाख पर्यंतच्या अनुदान मंजूर करण्यात येत होते या अनुदानाची ६० टक्के रक्कम मजुराच्या नावावर तर ४० टक्के रक्कम ही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत होती मात्र केंद्र सरकारने दोन लाखापेक्षा अनुदानावर बंदी घातल्याने मनरेगा कामामधील मोठा गोंधळ झाला आहे त्यामुळे राज्य सह जिल्ह्यातील शेतकऱ्याचे प्रस्ताव पंचायत समिती स्तरावर प्रलंबित आहेत सिंचन विहिरीचे फळबागाचे नवीन कामाला दोन लाखापेक्षा निधी मंजूर न होणे जुन्या पाच लाखाच्या मजुरीच्या कामाचे कुशल ऑनलाइन होणे अन चालू कुशल बिले थकल्याने प्रशासकीय प्रशासकीय अडथळा शेतकऱ्यांच्या मुळावर आल्याचे दिसत आहे आहे.वृक्ष लागवड बांबू लागवड गायकवाड सिंचन विहीर या सर्व कामाचे दोन लाखापेक्षा जास्त अंदाजपत्रक दाखल अडथळा येत आहे.

# पाटोदा तहसिल कार्यालयात शेतकऱ्यांच्या सहकार्यासाठी सुट्टीच्या दिवशीही महसूल अधिकारी-कर्मचारी कर्तव्यावर

पाटोदा प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात तीन ते चार वेळा झालेल्या अतिवृष्टीनंतर पाटोदा तालुक्यातील शेतीचे शंभर टक्के नुकसान झाले.अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्या तर खरीप हंगाम पूर्णपणे नष्ट झाला.या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली.बाधित क्षेत्रासाठी प्राथमिक मदत म्हणून तब्बल ५१ कोटींचा निधी पाटोदा तालुक्यास प्राप्त झाला.

मात्र अनेक शेतकऱ्यांची फार्मर आयडी आणि ई-केवायसी प्रक्रिया अपूर्ण असल्याने ते मदतीपासून वंचित राहिले होते.गुरुवारी सायंकाळी



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक पाटोदा तहसील कार्यालयाला भेट देऊन संपूर्ण मदतकार्यातील प्रगतीचा आढावा घेतला.त्यांनी महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना तातडीने फार्मर आयडी आणि ग्रीस्टॅग नोंदणी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर शनिवारी सुट्टीच्या दिवशी महसूल कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहून रात्री उशिरापर्यंत याद्या अपलोड करणे आणि नोंदणीचे काम सुरू ठेवले.या दिवशी एकाच दिवसात तब्बल ◀◀ पान ३ वर

# बीड नाळवंडी रस्त्याच्या प्रश्नासाठी बैलगाडी मोर्चा

## बीड नाळवंडी रस्त्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास ग्रामस्थ मतदान बहिष्कारावर ठाम

**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील नाळवंडी सर्कल परिसरातील ग्रामस्थांनी बीड नाळवंडी रस्त्याच्या प्रश्नासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बैलगाडी, अर्ध नग्न, थाळी नाद करून प्रशासनाचे व लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्याचे काम केले. हा बैलगाडी मोर्चा नाळवंडी नाका परिसरामध्ये देखील अडवण्यात आलेला होता परंतु आंदोलनकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत हा मोर्चा जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर धडला.**

बीड तालुक्यातील नाळवंडी गावाला बीड शहराकडून जोडला जाणारा रस्ता गेली २० वर्षे विकासाभावी



कितपत पडलेला आहे. याच ठिकाणच्या ग्रामस्थांनी या रस्त्याच्या प्रश्नासंदर्भात अनेक वेळा उपोषणे, निदर्शने केलेली आहेत परंतु सदरील प्रश्न अद्याप देखील मार्गी न निघाल्यामुळे यावेळी मात्र या परिसरातील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत काल जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बैलगाडी, अर्ध नग्न, थाळी नाद या मोर्चाच्या आयोजन केले होते. त्याचबरोबर सदरील रस्ता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांना अगोदर होणार नसेल तर आम्ही या परिसरालगत असलेले सर्व ग्रामस्थ मतदानावरती बहिष्कार टाकणार या मुद्द्यावरती ते ठाम असताना पाहायला मिळाले होते. तसेच या आंदोलनावेळी एका आंदोलनकर्त्याने सदरील रस्त्यावरील गाळाच्या पाण्याने स्वतः आंघोळ करत प्रशासनाचा व लोकप्रतिनिधीचा जाहीर निषेध व्यक्त केला. रस्ता नाही तर मतदान नाही असा नारा यावेळी नाळवंडी सर्कल मधील ग्रामस्थांनी पुकारलेला आहे. यामुळे सदरील सर्कलमधून ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शिरूर-जुन्नर-आंबेगाव तालुक्यातील बिबटे गुजरातला जाणार, वनमंत्र्यांनी मोठी घोषणा

**शिरूर । प्रतिनिधी**

पिंपरखेड (ता. शिरूर) येथे संतप्त जमावाने उद्विग्न होऊन वनविभागाचे वाहन जाळले आहे. त्या आंदोलकांवर कसलेही गुन्हे दाखल होणार नसल्याची ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली आहे. राज्यात वाढत्या बिबट्या-मानव संघर्षाला आळा घालण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. या वेळी ते बोलत होते.

या बैठकीस आमदार दिलीपराव वळसे पाटील, आंबेगाव-शिरूर विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ वनअधिकारी उपस्थित होते. बैठकीत बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या मानवी मृत्यूंवर ठोस तोडगा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीत पुढील सहा महिन्यांत ५०० ते ७०० बिबटे वनतारा



(गुजरात) येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी आवश्यक पिंजरे खरेदीसाठी शासनाकडून तात्काळ १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) आधारित सायरन सिस्टीम बिबट्या संचार क्षेत्रात बसविण्यास वनमंत्री गणेश नाईक यांनी मंजुरी दिली आहे. याशिवाय पिंपरखेड हद्दीतील नरभक्षी बिबट्यास मारण्यासाठी दिलेल्या परवानगीचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच बिबट्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी नसबंदी मोहिम राबविण्याबाबत राज्य शासनाचे शिष्टमंडळ केंद्रीय वनमंत्र्यांना भेटणार आहे. शिवाय, बिबट सफारी पार्कसाठी सेंट्रल झू ऑथॉरिटीकडून परवानगी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक हे मंत्रालयातील आजच्या कॅबिनेट बैठकीनंतर या विषयावर केंद्रीय वनमंत्र्यांशी सविस्तर चर्चा करणार आहेत. बैठकीत आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी मंजूर झालेल्या निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर लघुकाळीन आणि दीर्घकालीन कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच आंबेगाव, जुन्नर, खेड व शिरूर या तालुक्यांमध्ये वनकर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. बैठकीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री व आमदार दिलीप वळसे -पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जनता दल (सेक्युलर) प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, आशाताई बुचके, अप्पर मुख्य सचिव वने मिलिंद म्हैसकर, मुख्य वनसंरक्षक अतिष ठाकरे या सर्व विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे बाजीराव रोड हत्या प्रकरण! तीनही आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासून पुण्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं चित्र दिसत आहे. आजही पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. भरदिवसा तीन जणांनी मिळून एका तरुणाचा खून केल्याची घटना घडली आहे. मयंक खराडे (१७ वर्ष) असं हत्या झालेल्या तरुणाच नाव आहे. ही घटना पुण्यातील बाजीराव रोडवर घडली होती. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेले तीनही आरोपी हे विधी संघर्षग्रस्त बालक असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्वीच्या भांडणातून हा प्रकार घडल्याची माहिती आहे.

आरोपी निष्पन्न करुन कारवाई करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पूर्वीच्या भांडणातून हा प्रकार घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. गुन्हेगांविरोधात विरोधात मोहीम सुरू झाली आहे. अल्पवयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्हेगारीबद्दल एक मोठं आव्हान असल्याचे पोलीस अधिकारी म्हणाले. कायदेशीररित्या जे अधिकार आहेत त्यानुसार कारवाई होत असल्याचे पोलीस म्हणाले.

पुण्यात नव्याने उदयास येणाऱ्या माया टोळीचे हे कृत्य

बाजीराव रोड खून प्रकरण पूर्व वैमान्यासातूनच घडल्याचं समोर आलं आहे. या खून प्रकरणातील आरोपींची नाव निष्पन्न झाली आहेत. पुण्यातील नव्याने उदयास येणाऱ्या माया टोळीचे हे कृत्य असल्याचं बोललं जात



आहे. अभिजीत पाटील उर्फ माया, अमन उस्मान शिवलकर आणि अक्षय मारुती पाटोळे अशी या आरोपींची नावे आहेत. धारदार शस्त्रांचा वापर करत या तिघांनी मयंक खराडेचा खून केल्याची माहिती मिळाली आहे. आरोपींनी मयंक खराडेचे कोयत्याने केस छाटले होते. तसेच बोटही कापले होते. कापलेल बोट रात्यावर पडल्याचं पाहायला मिळालं.

मास्क घालून तीन तरुण आले आणि...

मिळालेल्या माहितीनुसार आज दुपारी ३ वाजून १५ मिनीटांच्या सुमारास ही घटना घडली आहे. अभिजीत इंगळे व त्याचा मित्र मयंक खरारे हे दुचाकीवरु जात असताना महाराणा प्रताप उद्यानाच्या जवळ दखनी मिसळच्या समोर अचानक जनता वसाहत मधील तीन तरुणांनी ज्यांनी मास्क लावला होता हे पाठीमागून आले. या तरुणांनी मयंक खराडे याच्या डोक्यात व तोंडावर शस्त्राने वार केले. त्यामध्ये मयंक खराडे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. गेल्या ३ दिवसात झालेला हा दुसरा खून आहे. त्यामुळे, शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. गेल्या काही महिन्यात अशा घटनांत वाढ झाल्याचं दिसून येत आहे. दोनच दिवसांपूर्वी पुण्यात गणेश काळे हत्याप्रकरणाने खळबळ उडाली होती. त्यानंतर, आता १७ वर्षीय मयंक खराडे या युवकाचा खून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे पुण्यातील मध्यवर्ती भाग असलेल्या बाजीराव रोडवर खुनाची घटना घडली आहे. धारदार शस्त्र वापरत आरोपीने खून केल्याची माहिती आहे. या खुनाच्या घटनेचं कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# काँग्रेसचा स्वबळाचा नारा! बारामतीत शरद पवार आणि अजित पवार दोघांनाही थेट आव्हान

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषदांच्या निवडणुका काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवणार असल्याची घोषणा काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण यांनी केली. या निवडणुकांमध्ये बारामतीचाही समावेश असून, शरद पवार आणि अजित पवार या दोघांचे पक्ष काँग्रेससाठी सारखेच प्रतिस्पर्धी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, जुन्नरची निवडणूक आघाडीच्या माध्यमातून लढवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष देविदास भन्साळी यांनी पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली. चव्हाण म्हणाले, पूर्वीच्या काही पदाधिकाऱ्यांनी पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय केला आणि पदे भोगल्यानंतर भाजपमध्ये प्रवेश केला. मात्र, त्यांच्या जाण्यामुळे पक्षाचे नुकसान होणार नाही. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या बळावर जिल्ह्यात काँग्रेसची पुन्हा उभारणी करू. आगामी सर्व निवडणुकांत काँग्रेस पक्ष सर्व गट, गण आणि वॉर्डांत आपले उमेदवार उभे करणार आहे. लोणावळा, खेड, हवेली, आंबेगाव, इंदापूर, तसेच बारामती येथेही आम्ही स्वबळावर लढणार आहोत, असेही चव्हाण म्हणाले. माजी जिल्हाध्यक्ष भन्साळी म्हणाले, १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतरही काँग्रेस पक्ष अडचणीतून बाहेर पडला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यश मिळवले. या वेळीही आम्ही ताकदीने लढून विजय मिळवू. बारामतीत शरद पवार आणि अजित पवार हे दोघेही आमच्यासाठी एकसारखे प्रतिस्पर्धी आहेत. आम्ही कोणाच्याही पुढे झुकणार नाही. मात्र, जिथे आवश्यक असेल, तिथे आघाडीचा विचार होऊ शकतो; पण आघाड्यांमुळे पक्ष आणि चिन्ह दोघांचे नुकसान होते, हे वास्तव असल्याचेही ते म्हणाले.

# गुडलक चौकात महिलांचा एल्गार ; रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी



**पुणे । प्रतिनिधी**

गुडलक चौकात कलाकार कट्टा येथे डॉ संपदा मुंडे यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत बिटिया फाउंडेशन, गुलाबो गँग आणि झाशीची राणी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

डॉ. मुंडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान करून त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचे काम चाकणकर यांनी केले आहे, असा आरोप या वेळी करण्यात आला. या आंदोलनात काँग्रेसच्या संगीता तिवारी, झाशीची राणी प्रतिष्ठानच्या रूपाली पाटील, शिवसेनेच्या स्वाती ढमाले, मनीषा कावेडिया, सोनिया ओव्हाळ, संगीता भालेराव, डिंपल इंगळे, वंदना साळवे, निसु कोटा, पूनम गुंजाळ, नीलम फाये सहभागी झाल्या. या वेळी चाकणकर यांच्या फोटोला लिपस्टिक लावून,आणि चिल्लरची माळ घालून जोडे मारण्यात आले. नंतर हा फोटो जाळण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार आणि सुनील तटकरे यांनी त्यांचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

# हडपसर ते लोणी काळभोर, हडपसर बस डेपो ते सासवड रोड या उपमार्गिकांना शासनाची मान्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रो टप्पा- २ खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मेट्रो मार्गिकेअंतर्गत हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या दोन मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीस आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या दोन उपमार्गिका एकूण १६ किलोमीटर लांबीच्या असून त्यामध्ये एकूण १४ उन्नत स्थानकांचा समावेश असेल. या दोन्ही उपमार्गिकांसाठी ५ हजार ७०४ कोटी रुपये खर्च येणार असून या पूर्णतः उन्नत मेट्रो प्रकल्पांची महा मेट्रोमार्फत अंमलबजावणी करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या दोन्ही प्रकल्पांमुळे पुणे शहरातील वाहतूक कोंडीपासून नागरिकांना दिलासा मिळेल. तसेच पुणे



मेट्रोचे जाळे पूर्वेकडे विस्तारित होणार असून पूर्व पुणे आणि परिसरातील ग्रामीण भागालाही मेट्रो सेवेचा लाभ मिळेल. लाखो प्रवाशांना जलद आणि सुरक्षित वाहतुकीची सुविधा उपलब्ध होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केला आहे. पुणे मेट्रो टप्पा-२ अंतर्गत होणाऱ्या या दोन उपमार्गिकांमुळे हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि सासवडसारख्या वाढत्या उपनगरांना मेट्रो जोडणी मिळेल. या मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचेल आणि प्रदुषण कमी होण्यास मदत होईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# २७ वर्षीय तरुणाचा खून करून मृतदेह विहिरीत फेकला

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव खडकी येथे २७ वर्षीय युवकाचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. ३) उघडकीस आली.याप्रकरणी संतोष बिजम पवार (वय ४१, पोलीस हवालदार, जुन्नर पोलीस स्टेशन) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला. अंकुश काशिनाथ पारधी (रा. तांबे, शिवेचीवाडी, ता. जुन्नर) आणि शिवराम बाळू जाधव (रा. कबाडवाडी, ता. जुन्नर) यांनी अरुण रोहीदास पारधी (वय २७, रा. तांबे, शिवेचीवाडी) या युवकाचा खून केल्याचा आरोप आहे.

२६ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास मौजे पिंपळगाव खडकी येथे राजू बबनराव शिंदे यांच्या विहिरीजवळ ही घटना घडली.अरुण पारधी हा चुलत भाऊजय हिरा विलास पारधी यांच्या पायाजवळ बसला होता, याचा राग मनात धरून आरोपींनी त्याच्यावर काठीने मारहाण केली. त्यानंतर दगडाने डोक्यावर प्रहार करून त्याचा खून केला आणि पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने अरुणच्या कमरेला कपड्याने दोन दगड बांधून त्याला विहिरीत टाकून दिले.

या प्रकरणी गुन्हा ३ नोव्हेंबर जुन्नर पोलीस स्टेशन डायरी क्रमांक ३९/२०२५ प्रमाणे नोंदविण्यात आला. गुन्ह्यात वापरलेले हत्यार म्हणजे काठी आणि दगड असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींचा पूर्व इतिहास निरंक असल्याचेही पोलिस सूत्रांनी स्पष्ट केले.

# क्रीडा संस्कृतीला मिळणार बळकटी

**पुणे । प्रतिनिधी**

'पुण्यात अनेक गुणवान खेळाडू आहेत. खासदार क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने सर्व खेळाडूंना आपले कौशल्य दाखवायला व्यासपीठ मिळणार आहे. यातून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला बळकटी मिळणार आहे. या स्पर्धेतून काही खेळाडू पुढे देशाचे नेतृत्व करू शकतात,' असे प्रतिपादन खेल रत्न पुरस्कार प्राप्त ऑलिंपियन नेमबाज अंजली भागवत यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट युवा फॉर विकसित भारत' या आवाहनाला प्रतिसाद देऊन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पहिला 'खासदार क्रीडा महोत्सवा'ला आज, रविवारपासून सुरुवात झाली. या महोत्सवाची सुरुवात मॅरेथॉनने झाली. स. प. महाविद्यालयाच्या मैदानात रविवारी झालेल्या पारितोषिक समारंभावेळी खासदार क्रीडा महोत्सवासाठीची ज्योत प्रज्वलन कार्यक्रम पार पडला. यावेळी अंजली




भागवत यांनी महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. ही ज्योत प्रज्वलीत करण्यासाठी ऑलिंपियन, आशियाई पदक विजेते आणि सर्वच खेळातील माजी खेळाडू, प्रशिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. या वेळी व्यासपीठावर श्रीरंग इनामदार, रमेश विपट, सुरेखा द्रविड, गौरव नाटेकर, संदीप कीर्तने, केदार जाधव, रेखा भिडे, मनोज पिंगळे, शांताराम जाधव, मनोर एरंडे, शकुंतला खटावकर, आकांक्षा हगवणे, कौस्तुभ राडकर असे आजी-माजी खेळाडू उपस्थित होते. खासदार मोहोळ यांनी आकाक्षात फुगे सोडून या स्पर्धेची सुरुवात केली. मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'तरुण तंदुरुस्त राहिला, तर देश तंदुरुस्त राहील. त्यासाठीच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माझ्या पुण्याने देशाला अनेक खेळाडू दिले आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने पुण्यातील क्रीडा संस्कृतीचा प्रचार-प्रसार करायचा आहे.' मोहोळ यांनी या वेळी मागे राहून हे व्यासपीठ खेळाडूंचे असल्याचे सांगून सर्व माजी खेळाडूंना पुढाकार घेण्यास सांगितले. खासदार क्रीडा महोत्सव १६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. शहरातील विविध मैदानांवर एकूण ३५ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा विविध खेळांच्या असोसिएशनच्या मदतीने आयोजित करण्यात येणार आहेत. या क्रीडा महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांनाही आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. भारतीय पारंपरिक खेळांसह आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांचा यात समावेश आहे. या स्पर्धा सणस मैदान, टिळक तलाव मैदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, म्हाळुंगे-बालेवाडी क्रीडा संकुल, स. प. महाविद्यालय, महाराष्ट्र मंडळ, डेक्कन जिमखाना, खराडी आदी ठिकाणी होणार आहेत.

# सासवडमध्ये एकाच रात्रीत ५ दुकाने फोडून लाखोंचा ऐवज लंपास

**सासवड । प्रतिनिधी**

सासवड शहरात रविवारी रात्री चोरट्यांनी एकाच रात्री सलग पाच दुकानांमध्ये घरफोडी करून सुमारे ३ लाख ३६ हजार ५०० किंमतीचा मुद्देमाल लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी ओंकार युवराज निगडे (वय २७, रा. शिक्षक सोसायटी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २ नोव्हेंबरच्या रात्री ९.३० ते ३ नोव्हेंबर सकाळी ६.०० या दरम्यान घडली. चोरट्यांनी सासवड येथील 'शूज आर्ट' या बूटांच्या दुकानासह, किसन मगर यांचे 'मगर बेकरी', मंगेश काकडे यांचे 'एम.के. मोबाईल शॉपी', किरण जगताप यांचे 'रामदेव फॅशन' आणि महेश भिंताडे यांचे 'हॅलो मोबाईल शॉपी' या दुकानांचे शटर उचकटून आत



प्रवेश केला. चोरट्यांनी विविध कंपन्यांचे मोबाईल फोन, टॅबलेट, चप्पल व शूजचा साठा, तसेच रोकड रक्कम असा एकूण ३.३६ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.त्यात अनेक कंपन्यांचे मोबाइल, रोकड रक्कम होती. फक्त मोबाइल शॉपमधूनच दीड लाखांचा माल चोरीस गेला आहे, बेकरी आणि कपड्यांच्या दुकानातूनही रोकड उडवली आहे. याप्रकरणी सासवड पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू असून रात्री उशिरा शहराच्या उपनगरांमध्ये संशयितांची हालचाल झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# निष्ठावान कार्यकर्त्याला पुढे घेऊन जाणार-अतुल बेनके

**नारायणगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार) जो कार्यकर्ता आजपर्यंत सन्मानाने, मनापासून आणि निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत राहिला त्यालाच पुढे घेऊन जाण्याची पक्षाची तयारी आहे, असे प्रतिपादन जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. सत्तेत असो अथवा नसो, निवडणुकीत पराभव झाला तरी शेवटच्या श्वासापर्यंत लोकांची सेवा व नाळ तुटू द्यायची नाही असे संस्कार व शिकवण स्वर्गीय वल्लभ बेनके यांनी दिली असल्याचे नमूद केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जुन्नर नगरपंचायत साठी २० नगरसेवक व १ जागा नगराध्यक्षाची आहे. निवडणुकीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी प्रत्येकी दोन ते तीन इच्छुक उमेदवारांची नावे प्राप्त झाली आहेत. काहींनी तर पोस्टर लावून प्रचारालाही सुरुवात केली आहे.आघाडी अथवा युती करताना राष्ट्रवादी पक्षाकडे इच्छुकांची मोठी संख्या असल्याने कोणाला उमेदवारी द्यायची हा मोठा प्रश्न आहे. सर्वच उमेदवार ताकदीचे आहेत. राष्ट्रवादी पक्षाकडे जुन्नर नगरपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक स्वबळावर लढण्याची क्षमता आहे. तशी तयारी असून त्या दृष्टीने वाटचाल चालू आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आज पर्यंत एकाचीही उमेदवारी निश्चित झालेली नाही. इच्छुक उमेदवारांची निवड जिल्हाध्यक्ष व वरिष्ठ नेते करतील. इतर पक्षाच्या इच्छुक उमेदवारांनी प्रथम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये पक्ष प्रवेश करुन सदस्यत्व घ्यावे. त्यानंतरच वरिष्ठांशी चर्चा करून त्यांचा निर्णय घेतला जाईल जुन्नर नगरपंचायत निवडणूक लढविण्यास इच्छुक हट्ट असलेल्या उमेदवारांनी १० तारखेपर्यंत फॉर्म भरून द्यावेत. अंतिम मतदार यादीत काही बदल झाले असल्याचे बोलले जात आहे, परंतु त्याची माहिती सीईओंकडून घेतली जाईल. मतदार यादीत बदल झालेले असल्यास निवडणूक आयोगाकडे तक्रार केली जाईल.

# दिवसाढवळ्या तरुणाची निर्घृण हत्या; भर रस्त्यात रक्तरंजित थरार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारीने डोके वर काढले आहे. मध्यवर्ती आणि नेहमी गजबजलेल्या बाजीराव रोडवर दिवसाढवळ्या धारदार शस्त्राने एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मयंक खरारे (राहणार, आंबील ओढा) असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून, ही घटना महाराणा प्रताप उद्यानाजवळील दखनी मिसळच्या समोर दुपारी सुमारे ३.१५ वाजता घडली.

मयंक आपल्या मित्रासोबत दुचाकीवरून जात असताना जनता वसाहतीतील तीन मास्कधारी तरुणांनी पाठीमागून अचानक हल्ला केला. या हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने त्याच्या डोक्यावर आणि तोंडावर वार करून जागीच ठार मारले. त्याचा मित्र अभिजीत इंगळे सुदैवाने बचावला, परंतु तो मानसिक धक्क्यात आहे. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून, पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. घटनास्थळी पोलीस तात्काळ दाखल झाले आणि आरोपींच्या शोधासाठी मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

यापूर्वी काही दिवसांपूर्वीच कोंढवा परिसरात गणेश काळे याची दिवसाढवळ्या हत्या झाली होती. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, तसेच शहरात कायद्याचा धाक उरला आहे का, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

# महापालिका आयुक्त यांची देवाची उरुळी कचरा डेपो परिसराला भेट

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी (दि. ०२) देवाची उरुळी कचरा डेपो परिसरास भेट देऊन तेथील कामकाजाची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी पुणे मनपाच्या बायोमायनिंग प्रकल्प तसेच ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी महापालिका आयुक्त यांनी हडपसर आणि घोले रोड येथील कचरा हस्तांतरण केंद्र यांचे आधुनिकीकरण करणे, घरोघरी जाऊन वाहनांद्वारे कचरा गोळा करणे कामी आधुनिक यंत्रणा निर्माण करणे, स्मार्ट कलेक्शन केंद्र निर्माण करणे, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे कामकाज गतीने पूर्ण करणे याबाबत आदेश दिले. निरीक्षणादरम्यान आयुक्त नवल किशोर राम यांनी पुणे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व शाश्वत करण्यासाठी अजून नवे कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. त्यांनी पुढील



काळात महानगरपालिकेची कचरा प्रक्रिया क्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश दिले.यावेळी मा. आयुक्त यांनी लिगसी वेस्ट (जुना कचरा) यावर शास्त्रोक्त बायोमायनिंग / बायो-रिमेडियेशन प्रक्रिया एक वर्षाच्या आत पूर्ण करून संबंधित जागा रिकामी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. त्यांनी नमूद केले की, रिकामी करण्यात आलेली जागा लोकोपयोगी प्रकल्प अथवा विकास योजनांसाठी वापरणे शक्य होईल. या पाहणीदरम्यान घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख संदिप कदम, कार्यकारी अभियंता प्रसाद जगताप व अमर मदिकुंट, संबंधित अधिकारी व कंत्राटदार प्रतिनिधी उपस्थित होते. पुणे महानगरपालिका पर्यावरणीय दृष्टीने शाश्वत कचरा व्यवस्थापनासाठी कटिबद्ध असून, येणाऱ्या काळात नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छ आणि हरित पुण्याच्या दिशेने पुढील पाऊले उचलली जातील, असेही यावेळी सांगण्यात आले.